गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रीज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २८.०५.२०२५ | अंक नं. ४९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# दोघा अकौंटंटने कंपनीत केला नऊ कोटी ८१ लाखांचा अपहार

## स्वतःच्या व नातेवाईकांच्या बँक खात्यात पाठविले पैसे, नगरमधील दोघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर शहरात मुख्य कार्यालय आणि पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसी येथे शाखा कार्यालय असलेल्या इलाईट इंटरनॅशनल या कंपनीत सिनियर व ज्युनियर अकौंटंट म्हणून काम पाहणाऱ्या दोघांनी सन २०२० ते जानेवारी २०२५ या कालावधीत सुमारे ९ कोटी ८१ लाख ६६ हजार ९५७ रुपयांचा संगनमताने अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी पुनीत अभयराज गुगळे (रा. कोर्टगल्ली, नगर) व अन्सार निसार शेख (रा. गजराजनगर, छत्रपती संभाजीनगर रोड, अ.नगर) या दोघांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कंपनीचे मालक अभिजित विनोद गांधी (वय ३८, रा. कराचीवाला नगर, अ.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी गांधी यांच्या आई उमा गांधी यांच्या नावे नगरमध्ये सन २०१२ मध्ये इलाईट इंटरनॅशनल या नावाची फर्म सुरु करण्यात आलेली असून त्याचे मुख्य कार्यालय नगरमध्ये तेलीखुंट येथे असून एक कार्यालय चाकण येथे आहे. कंपनीमार्फत देशात तसेच परदेशातही इंडस्ट्रीयल पॅकेजिंग, इंडस्ट्रीयल कंपोनंट, ऑटो पार्टच्या आयात निर्यातीचा व्यवसाय चालतो. या कंपनीत दैनंदिन व्यवहाराचा हिशोब ठेवण्यासाठी तसेच विविध पेमेंट करण्यासाठी सिनियर अकौंटंट म्हणून पुनीत गुगळे व ज्युनियर अकौंटंट म्हणून अन्सार शेख यांना कामावर ठेवण्यात आलेले होते. बरीच वर्षे ते काम करत असल्याने कंपनीचे आर्थिक व्यवहार तेच पाहत होते. कंपनीचे मालक असलेल्या फिर्यादी व त्यांच्या कुटुंबियांचा या दोघांनी विश्वास संपादन केलेला होता.

डिसेंबर २०२४ मध्ये यातील ज्युनियर अकौंटंट अन्सार शेख याने मला माझी मालमत्ता विकायची आहे.

*(पुढील मजकूर पान २ वर)*

सोनेतारण कर्ज
५ मिनिटांत कर्ज - No Hidden Charges
प्रती १० ग्रॅमवर 65,000/-*
कमीत कमी व्याजदर
मुदत ठेव - १३ ते २४ महिने 8.50% ❋ ज्येष्ठ नागरिकांसाठी 9%
धनसंचय/दरमहा/तिमाही व्याज
SSGJOP
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या.
मुख्य शाखा - अर्बन बँक रोड, गुगळे मेडिकल समोर, अहमदनगर. फोन : २३५४२९५
शाखा : मार्केट यार्ड, अ.नगर. फोन : २४५११९५
वेअरहाऊस माल तारण कर्ज - 9.00% व्याजदर

# जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे तिघांचा मृत्यू

## २५ जणांना वाचविण्यात यश; स्लॅब कोसळून युवतीचा तर भिंत अंगावर पडून वृद्धाचा मृत्यू, पाण्यात बुडून बालक दगावले

नगर – नगर शहरासह दक्षिण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने अक्षरशः धुमाकुळ सुरू केला आहे. या पावसामुळे शेती पिकांसह नागरिकांच्या घरांचे नुकसान होताना दिसत आहे. २६ मे रोजी रात्री ते २७ मे रोजी सायंकाळपर्यंत तीघांचा पावसामुळे बळी गेला असून, यात नगर शहरात एका १९ वर्षीय तरुणीचा, नगर तालुक्यातील चास येथील १० वर्षीय बालकाचा आणि कर्जतमध्ये ६३ वर्षीय वृद्धाचा समावेश आहे. नगर तालुक्यातील खडकी येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या १० तर वाळकी येथे १५ जणांना वाचविण्यात पोलिस प्रशासन आणि लष्कराच्या पथकाला यश आले आहे.

नगर शहरासह नगर तालुक्याच्या दक्षिण भागात २७ मे रोजी दुपारी १२ च्या सुमारास मुसळधार पाऊस सुरू झाला. या पावसात सारसनगर भागातील एका बंगल्याचा स्लॅब कोसळून १९ वर्षीय तन्वी केदार रासने हिचा मृत्यू झाला. तन्वी दुचाकीवरून घरी आली आणि गाडी लावून घरात प्रवेश करत असताना पोर्चचा स्लॅब तिच्या अंगावर कोसळला व त्यामुळे ती गंभीर जखमी झाली. यावेळी मनपाच्या आपत्कालीन विभागातील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी तन्वीला गंभीर जखमी अवस्थेत बाहेर काढत तात्काळ उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.कोल्हे यांनी तिला तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अशीच आणखी एक घटना २६ मे रोजी रात्री कर्जत तालुक्यातील खेड येथे घडली. येथील हजीबा मोहन सुपेकर (रा. खेड, ता. कर्जत) यांच्या अंगावर घराची भिंत कोसळून त्यात सुपेकर यांचा मृत्यू झाला.

### पाण्याच्या डबक्यात बुडून बालकाचा मृत्यू

नगर तालुक्यातील चास परिसरात २७ मे रोजी दुपारी अतिवृष्टी झाली. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. या मुसळधार पावसामुळे घराशेजारी मोठे पाण्याचे डबके साचले होते. त्यात पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडून अमितेश बलराज बिडे (वय १०) या बालकाचा मृत्यू झाला. सायंकाळी ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. अमितेश पाण्याच्या डबक्यात बुडाल्याचे लक्षात आल्यावर त्याचे चुलते जयसिंग बिडे यांनी त्यास पाण्याच्या बाहेर काढून बेशुद्धावस्थेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### बुरूडगाव, कल्याण रोडचा संपर्क दिवसभर तुटला

शहर परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने सीना नदीला मोठा पूर आल्याने बुरडगावचा संपर्क तुटला होता. याचबरोबर कल्याण राष्ट्रीय महामार्ग दिवसभर बंद होता. जोराच्या पावसामुळे ठिकठिकाणी नागरिकांच्या घरात पाणी घुसले होते. नगरच्या कापड बाजारात एका इमारतीचा काही भाग पावसाने कोसळला. तसेच, माळीवाडा येथील पार गल्ली येथे एका घराची, तर केडगाव अमरधाम स्मशानभूमीची भिंत कोसळली. केडगाव येथील अमरधाम परिसर, चिपाडे मळा, सोनेवाडी रोड येथे उड्यावरील रस्ते पाण्याखाली गेले होते. आनंदऋषिजी हॉस्पिटलजवळ मोठे झाड उन्मळून पडल्याने एक नागरिक जखमी झाला. तर काही वाहनांचे नुकसान झाले.

### खडकी, वाळकी येथे २५ जणांची पुराच्या पाण्यातून सुटका

मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अहिल्यानगर तालुक्यातील खडकी व वाळकी गावामध्ये वालुंबा व पूर्वा नदीला पूर आल्याने गावामध्ये पाण्याची पातळी वाढली. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लष्कराच्या आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूलच्या जवानांना मदतीसाठी पाचारण केले. लष्कराने वाळकी येथून १५ जणांची सुटका करत त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. तर नगर तालुका पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने खडकी येथे पुराच्या पाण्यात अडकलेल्या १० जणांना सुखरूप पाण्याच्या बाहेर काढले.

### केडगाव, सावेडी, चास, वाळकी मंडलांत अतिवृष्टी

नगर शहर व तालुक्यात २७ मे रोजीच्या पावसाने चांगलाच हाहाकार उडाला होता. २७ मे रोजी सकाळी ८ ते २८ मे रोजी सकाळी ८ वाजे पर्यंतच्या २४ तासांत शहर व तालुक्यातील १२ महसुली मंडलांच्या पैकी केडगाव, सावेडी, चास, वाळकी या ४ मंडलांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. केडगाव मध्ये १००.५ मिमी, चास मध्ये ११८.३ मिमी, वाळकीत १००.५ मिमी तर सावेडी मध्ये ८७ मिमी पाऊस नोंदवला गेला. शासनाच्या नियमानुसार ६५ मिमी किंवा त्या पेक्षा जास्त पाऊस झाल्यास ती अतिवृष्टी समजली जाते.

याशिवाय नागापूर मंडलात ७.८ मिमी, नालेगाव २४.३ मिमी, कापूरवाडी ५२.८ मिमी, भिंगार २४ मिमी, जेऊर १६.३ मिमी, चिचोंडी पाटील ३१ मिमी, रुईछत्तीसी २७ मिमी, नेप्ती १३.३ मिमी अशी नगर तालुक्यात सरासरी ५०.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

श्रद्धांजली

स्व. रुक्मिणीबाई लोकूमल मेंघानी
स्व. दि. २८ मे २००८
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..
राम एजन्सी
मेंघाणी परिवार
मार्केटयार्ड 2419143 | नवी पेठ 2419142 | सावेडी 2419141

An ISO 9001:2015 Certified
MAHA DISCOUNT offer
DiSHA COMPUTER INSTITUTE
Just in Any Course 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

वॉटर ओव्हरफ्लो अलार्म लावा
पाणी आणि वीज दोन्ही वाचवा!
• साउंड अलर्ट (हिंदी/इंग्रजी)
• चालू/बंद करण्यासाठी सूचक
• पाण्याची व विजेची बचत होते
• दोन पिन प्लग असलेली एक-मीटर केबल
फक्त ₹500/- मध्ये
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
❋ डोकेदुखी, मायग्रेन ❋ फिटचे आजार, अपस्मार ❋ हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज ❋ तोल जाणे ❋ व्हर्टिगो, चक्कर येणे ❋ अर्धांगवायू, पॅरेलीसीस ❋ विस्मरण ❋ थरथर सुटणे, पार्किन्सन
अक्षय (गिते) हॉस्पिटल
मो : 9257575718, 9764416136
❋ सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
❋ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
एशियन नोबल हॉस्पिटल

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


# शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न पंधरा दिवसात मार्गी लावणारच

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर पोलिस प्रशासनाचे आश्वासन

नगर – शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाला चक्काजाम आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. शहरातील वाहतुकीची समस्या १५ दिवसात सोडविली जाईल, असे आश्वासन पोलीस प्रशासनाच्या वतीने शिष्टमंडळास दिल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिली.

यावेळी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले, शहरातील नागरिकांनी वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करावे तसेच कानेटिक चौक, केडगाव वेस, माळीवाडा बस स्टॅण्ड, मार्केट यार्ड, सक्कर चौक, कोठला स्टॅण्ड, प्रोफेसर कॉलनी चौक, दिल्लीगेट, प्रेमदान चौक, भिस्तबाग चौक या परिसरामध्ये नियमित वाहतूक पोलीस ठेवले जातील, अवैध वाहतूक प्रवासी करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, एसटी स्टॅण्ड परिसरातील ट्रॅव्हल्स्चा थांबा बंद केला जाईल, शहरातील पॅगो रिक्षाला देखील शिस्त लावली जाईल. या कामासाठी महापालिकेने देखील सहकार्य करण्याची गरज आहे. रस्त्यावरील अतिक्रमणांबाबत महापालिकेने कठोर कारवाई केली पाहिजे, पोलीस प्रशासन नागरिकांच्या सहकार्यातून नक्कीच वाहतुकीची शिस्त लावेल, असे ते म्हणाले.


वाहतूक प्रश्नाबाबत पोलीस प्रशासन व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक पार पडली. (छाया – लहू दळवी)

बैठकीमध्ये वाहतुकीच्या समस्या बाबत चर्चा झाली आहे शहरात गर्दीच्या ठिकाणी वाहतूक शाखेचे पोलीस उभे राहणार आहे अशी माहिती संपत बारस्कर यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, नितीन घोडके, वैभव ढाकणे, जॉय लोखंडे, दीपक खेडकर आदी उपस्थित होते.

## प्रेरणादायी अक्षरधन...







### वाढती अर्थसाक्षरता.. महासत्तेकडे मजल

शतकापूर्वी केवळ जमीन, सोने यासारख्या पारंपरिक प्रकारात गुंतवणूक (लपवणूक) करणारा भारत आज नव्या युगाच्या नव्या संकल्पनेने साक्षर होत सहज साध्य संपत्ती निर्माण करीत आहे.

५–६ दशकांपूर्वी बचतीचे प्रमाण ३५% पर्यंत होते आज तीच बचत म्युच्युअल फंड, एसआयपी व शेअर मार्केटशी निगडित योजनांत आली आहे. या वाढत्या अर्थसाक्षरतेमुळे महासत्तेकडे वाटचाल सुकर होईल यात शंका नाही.

देशाच्या म्युच्युअल फंडात व या उद्योगांत गुंतवणूकदारांचा दीर्घकालीन गुंतवणुकीद्वारे संपत्ती निर्मितीवर विश्वास वाढत आहे.

डायरेक्ट प्लॅनमधील एसआयपीमधील प्रमाण गेल्या ४ वर्षा १०% वाढले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एसआयपी मालमत्तेत ५ वर्षांपेक्षा जास्त होल्डिंग असलेल्या गुंतवणुकीच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झाली आहे. लोक भान ठेवून शिस्तबद्धपणे गुंतवणूक करीत आहेत.

५ वर्षे होल्ड करणाऱ्या गुंतवणूकदारांमध्ये ५ पट वाढ झाली असून, विशेष म्हणजे तरुणांपेक्षा धोका पत्करून ज्येष्ठ मंडळी आक्रमक गुंतवणूक करत आहेत. अर्थात मुख्य मोठ्या ५–७ शहरांत ही मंडळी अधिक असली तरी हातातल्या मोबाईल इ. मुळे हे लोण ग्रामीण भागातही पसरत आहे.

निवृत्तीजवळील लोक इक्विटीतला वाटा ५६% आहे जो २०२० मध्ये ४९% होता. तर २५ वर्षाखालील तरुणांची इक्विटी गुंतवणूक ४७% पर्यंत वाढलीय.

म्युच्युअल फंड एयुएम ते जीडीपी प्रमाण विक्रमी २०% पर्यंत पोहोचलंय. Fill/FDI यांनी मार्केटमधून पाय काढून घेतला तरी भारतीय शेअर मार्केटला खूप मोठा फरक पडत नाहीय – ही महासत्तेकडे होणारी वाटचालच नाही काय?

## तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे ३० मे रोजी आयोजन

नगर – उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर भाग यांच्या अध्यक्षतेखाली ३० मे रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, अहिल्यानगर येथे तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार अहिल्यानगर यांनी दिली आहे.

# अहिल्यानगरचा नरक करणाऱ्या प्रशासनाने नगरकरांना 'होड्या' उपलब्ध करून द्याव्यात

## मान्सूनपूर्वीच शहर पाण्याखाली, ही नैसर्गिक आपत्ती नव्हे तर ढिसाळ नियोजनाचे बळी

नगर – अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर पडतो आहे. या पावसानेच संपूर्ण शहराची दाणादाण उडाली असून शहराचा नरक झाला आहे. मान्सून पूर्वीच शहर पाण्याखाली गेले आहे. ही नैसर्गिक आपत्ती नव्हे तर शहर ढिसाळ नियोजनाचे बळी ठरत आहे. नियोजनशून्य कारभार करणाऱ्या मनपा प्रशासनाने अहिल्यानगरकरांना प्रवासासाठी होड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहरप्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

काळे यांनी म्हटले आहे, सीना नदीवरील नगर–कल्याण रोडवरील प्रस्तावित पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. अनेक वेळा याची पाहणी झाली. आश्वासने दिली गेली. मात्र प्रत्यक्षात आजवर कामाला सुरुवात नाही झाली. विशेषतः वारुळाचा मारुती, नेप्ती नाका, कायनेटिक चौका जवळील सीना नदीवरील पूल या परिसरामध्ये काही ठिकाणी पुलाच्या वरून तर काही ठिकाणी पूलाला लागून पाणी वाहते आहे.

सीना नदी पात्राच्या खोलीकरण व रुंदीकरणाचा विषय देखील प्रशासन मार्गी लावू शकलेले नाही. सीना आता नदी राहिली नसून त्याचा नाला झाला आहे. या पात्रात बहुतांश ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वनस्पती पसरली आहे. नालेसफाई मोहिमेत याची स्वच्छता होण्याची गरज होती. मात्र हे काम अपूर्ण आहे. परिणामी नदीला पूर आला असून हजारो नागरिकांचा मुख्य शहराशी असणारा संपर्क तुटला असून दळणवळण थांबले आहे. शहराच्या बाजारपेठेसह सावेडी, केडगाव, बोल्हेगाव, नागापूर सर्वच उपनगरांमध्ये रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरिकांना गाडीवरून प्रवास करणे अशक्य होत आहे. जनजीवन, दळणवळण सुरळीत चालायचं असेल तर आता एकच पर्याय उरला आहे. मनपा प्रशासनाने तात्काळ नागरिकांना होड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी काळे यांनी केली आहे.

**ते गायब झाले आहेत :** मनपा आयुक्त यशवंत डांगे हे शहर अडचणीत असताना दीर्घ रजेवर गेले आहेत. शहरात विकास कामे सुरू असल्याचा डांगोरा पिटत फोटो सेशनची चमकोगिरी आयुक्त महोदय नेहमी करत असतात. आता शहराचा नरक झाला असताना चमकोगिरी करणारे मात्र गायब आहेत. राज्यात, देशात महायुती, मोदींचे सरकार आहे. शहराचे लोकप्रतिनिधी तसेच बहुतांश माजी नगरसेवक हे सत्ताधारी पक्षात आहेत. मात्र या सर्वच अकार्यक्षम सत्ताधाऱ्यांना नागरिकांच्या होत असणाऱ्या गैरसोयीचा विसर पडला आहे. मिस्टर इंडियाचे घड्याळ घालून ते आता गायब झाले आहेत, अशी टीका काळे यांनी केली आहे.

**आपत्ती काळात शिवसेनेशी संपर्क साधा :** शहरातील सद्य आपत्ती जनक परिस्थितीमध्ये नागरिकांना प्रशासनाचा प्रतिसाद मिळत नसल्यास त्यांनी शिवसेना ठाकरे पक्षाच्या ९०२८७२५३६८ त्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन किरण काळे यांनी केले आहे.

## नऊ कोटी ८१ लाखांचा अपहार

(पान १ वरुन)

ती दुसऱ्याला देण्यापेक्षा तुम्हीच खरेदी करा असा आग्रह फिर्यादी अभिजित गांधी यांच्याकडे धरला. त्यांनी त्याच्या म्हणण्यानुसार जानेवारी २०२५ मध्ये त्यास बाजारभावाप्रमाणे पैसे देवून मालमत्तेचा खरेदी व्यवहार करण्यात आला. त्यानंतर शेख याने मला पुण्यात व्यवसाय सुरु करायचा आहे असे सांगून काम सोडले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी सिनियर अकौंटंट पुनीत गुगळे फिर्यादीकडे आला व मला पुण्यात व्यवसाय सुरु करायचा आहे असे सांगून त्यानेही काम सोडले.

### दोघांनी एकाचवेळी अचानक काम सोडल्याने बळावला संशय

या दोघांनी एकाच वेळी अचानक काम सोडल्याने फिर्यादीला त्यांच्यावर संशय आला. त्यामुळे त्यांनी कंपनीच्या टॅली सॉफ्टवेअर मधील नोंदी आणि विविध बँकांमध्ये असलेल्या खात्यांचे व्यवहार यांची तपासणी सुरु केली. या तपासणीत त्यांना सन २०२० पासून पुनीत गुगळे व अन्सार शेख या दोघांनी संगनमत करून खोट्या नोंदी दाखवून वेळोवेळी सुमारे ९ कोटी ८१ लाख ६६ हजार ९५७ एवढी रक्कम त्यांच्या स्वतःच्या तसेच नातेवाईकांच्या नावावर असलेल्या बँक खात्यांमध्ये पाठविल्याचे निदर्शनास आले. या दोघांनी कंपनीत अपहार केल्याचे समोर आल्यावर अभिजित गांधी यांनी याबाबत १२ एप्रिल रोजी पोलिस अधिक्षक कार्यालयात तक्रार अर्ज दिला. या अर्जावर चौकशी होवून गुन्हा दाखल करण्याचे आदेश झाल्यावर गांधी यांनी २७ मे रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी पुनीत गुगळे व अन्सार शेख यांच्याविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## दुकानात गळफास घेऊन आत्महत्या

नगर – बी बियाणे व कीटकनाशक विक्री दुकानाच्या छताला गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील टाकळी काझी गावात २७ मे रोजी सकाळी उघडकीस आली. प्रसाद संभाजी म्हस्के (वय ३०, रा. टाकळी काझी, ता.नगर) असे मयत तरुणाचे नाव आहे. त्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा आहे.


प्रसाद म्हस्के (मयत)

प्रसाद म्हस्के याने दुकानात गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्याने त्याचा भाऊ प्रवीण म्हस्के याने त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. खराडे यांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार मोहिनी कर्डक या करीत आहेत. मयत प्रसाद म्हस्के याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी आणि ३ महिने वयाचा लहान मुलगा असा परिवार आहे.

# नागरिकांना वाऱ्यावर सोडून महापालिका आयुक्त सुट्टीवर

## अहिल्यानगर शहराला वाली कोण?: नितीन भुतारे

नगर – अवकाळी पावसामुळे अहिल्यानगर शहरात ढगफुटी सदृश्य पाऊस पडत आहे. सलग ३ दिवस झालेल्या पावसाने सीना नदी तसेच शहरातील अंतर्गत ओढ्यांना पूर येत आहे. नगर शहरात नदी, नाले, ओढे साफसफाईचे काम हे ५० ते ६० टक्के पूर्ण झाल्याचा महानगरपालिकेचा दावा सपशेल फोल ठरत असून, या कामांमध्ये दरवर्षी मोठा भ्रष्टाचार होत असल्याचे आरोप नितीन भुतारे यांनी केला आहे.



नदी, नाले, ओढे साफसफाईकरिता २०२२ ते २०२३ या वर्षात निविदा रक्कम जवळपास २५ लाखांपर्यंत होती, ती मागील दोन वर्षात दुपटीपेक्षा अधिक किमतीने वाढून ६० लाख रुपये खर्च करण्यात येत आहे. यातून असे दिसते की, यामागील काळामध्ये २५ लाख रुपयात होणारी ही दुपटीने वाढून ६० लाख रुपयांपर्यंत नेण्यात आली. अतिक्रमण विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने ही रक्कम वाढवण्यात आली, असे दिसून येते. दरवर्षी फक्त नावालाच ओढे, नदीच्या, नाल्याच्या तोंडाजवळ साफसफाई केली जाते व संपूर्ण नदी, नाले, ओढे हे भरलेले राहतात. त्यामध्ये गाळ पूर्णपणे काढलेला दिसत नाही व नदी, नाल्यांचा प्रवाह मोठा करण्याचे काम संबंधित ठेकेदार पूर्ण करत नाही. ठेकेदाराला पाठीशी घालून अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने नदी, नाले, ओढे सफाईचे काम करून दरवर्षी लाखो रुपये खिशात घालण्याचा प्रकार महानगरपालिकेच्या वतीने होत आहे. हे नुकत्याच झालेल्या पावसातून नदीला आलेल्या पुरामुळे दिसून येते.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे हे जवळपास १५ दिवसांच्या सुट्टीवर गेलेले आहे. शहराची परिस्थिती जर पाहिली तर रस्त्यांवर पाणी आहे. नदीला पूर आल्यानंतर नागरिकांच्या घरात पाणी घुसले. हे सर्व होत असताना प्रशासक म्हणून त्यांची जबाबदारी असताना आपत्कालीन परिस्थितीत १५ दिवस सुट्टी घेऊन शहराला वाऱ्यावर सोडून जाणे, ही आयुक्त यशवंत डांगे यांची भूमिका योग्य नाही.

गटारींची साफसफाई करताना संबंधित ठेकेदार गटारीतील गाळ काढताना दिसत नाही. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापन म्हणून कुठलीही यंत्रणा या महानगरपालिकेकडे नाही. नदी, ओढे, नाले यांना पूर आल्यानंतर महानगरपालिका जागे होते. मे महिन्याअगोदरच ही सर्व कामे पूर्ण होणे गरजेचे होते, परंतु पावसाळा सुरू असतानासुद्धा ओढे, नाले, साफसफाई चे काम सुरू असल्याचे दिसून येते, असा आरोपही नितीन भुतारे यांनी केला आहे. याबाबतची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मेल द्वारे पाठविली आहे.

## समृद्धी महामार्गावर नगरच्या विवेक आजबे याचे निधन

नगर – समृद्धी महामार्गावर अकोल्याजवळ २७ मे रोजी पहाटे झालेल्या अपघातात नगर एमआयडीसी जवळील नवनागापूर येथील विवेक संतोष आजबे (वय १७ ) या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



मयत विवेक हा त्याच्या चुलत भावाच्या विवाह समारंभाच्या कार्यक्रमा निमित्त नागपूर जात होता. समृद्धी महामार्गावरून प्रवास करत असताना अकोल्याच्या जवळ शेलूबाजार येथे पहाटेच्या सुमारास गाडीवरील नियंत्रण सुटल्याने त्याच्या गाडीचा अपघातात होवून त्यात त्याचा मृत्यू झाला. मयत विवेक हा नागापूरच्या सन फार्मा विद्यालय या ठिकाणी बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत होता. त्याच्या पाठीमागे आई, वडील, बहीण, भाऊ, काका, काकू, आजी, आजोबा असा परिवार आहे.

## योग शिक्षिका सौ.पूनम गांधी यांचे निधन

श्रीरामपूर – येथील वडाळा महादेव येथील अजितदादा पॉलिटेक्निक कॉलेजच्या योग शिक्षिका सौ.पूनम सुहास गांधी (वय ४२) यांचे २७ मे रोजी सकाळी १० वा. ओव्हरब्रिज जवळ अपघात झाला होता. अहिल्यानगर येथील साईदिप हॉस्पिटल येथे उपचार चालू असतानाच सायंकाळी ६ वा. त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पश्चात सासू, पती, एक मुलगा, एक मुलगी, दिर, पुतणे असा परिवार आहे. सुहास सुरेश गांधी यांच्या धर्मपत्नी, मेनरोड येथील सिया कम्युनिकेशनचे मालक सुशील गांधी यांच्या भावजई, कु.सिया व चि.नक्ष गांधी यांच्या मातोश्री होत.

# आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी महापालिकेकडून मदतीसाठी संपर्क क्रमांक जाहीर

## ओढे व नाल्यांच्या साफसफाईसह सीना नदीपात्रात जलपर्णी हटवण्याचे काम सुरू

नगर – शहरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. महानगरपालिकेमार्फत ओढे व नाल्यांची साफसफाई सुरूच आहे. तसेच, सीना नदी पात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाहून आल्या आहेत. सोमवारी रात्रीपासून या जलपर्णी काढून प्रवाह मोकळे करण्याचे काम रात्रंदिवस सुरू आहे. शहरात जिथे पाणी साचल्याच्या तक्रारी येत आहेत, तिथे आपत्कालीन यंत्रणा तत्काळ मदत उपलब्ध करून देत आहे. नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षात अथवा संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.



गेल्या काही दिवसांपासून ओढे नाले साफसफाई सुरू आहे. सोमवारी व मंगळवारी दिवसभर शहरात सीना नदी पात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाहून आल्या होत्या. सोम वारी रात्रीपासूनच महानगरपालिका प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत या जलपर्णी काढून प्रवाह मोकळा करण्याचे काम सुरू केले आहे. रात्रभर काम सुरू होते व आताही सुरूच आहे. शहरातील ओढे व नाल्यांची साफसफाई बहुतांश प्रमाणात पूर्ण झाली आहे. उर्वरित साफसफाई सुरू असून, तीही येत्या दोन ते चार दिवसात पूर्ण होईल. यंदा पाऊस लवकर आल्याने नालेसफाईच्या कामात काहीसे अडथळे येत आहेत. मात्र, तरीही त्यावर उपाययोजना करून प्रवाह मोकळे करण्याचे काम सुरू असल्याचे अभियंता सुरेश इथापे यांनी सांगितले.

पावसाळ्याच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अहिल्यानगर महानगरपालिका सज्ज आहे. आपल्या घरात पाणी शिरले असल्यास अथवा इतर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली असल्यास प्रभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. प्रभाग समिती कार्यालय क्र.१ सावेडी निखिल फराटे मोबाईल ९९२३२७४३४९, प्रभाग समिती कार्यालय क्र.२ शहर, राकेश कोतकर मोबाइल ९२८४५४२०३६ किंवा ९४०३३७७७२५, प्रभाग समिती कार्यालय क्र.३ झेंडीगेट शाम गोडाळकर मो. नं. ८७८८२१३२७०, प्रभाग समिती कार्यालय क्र.४ बुरुडगाव अनिल बाबर मो. नं. ९८९०६३९०९० या क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, धोकादायक इमारत हटवण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. पार गल्ली, माळीवाडा परिसरातील धोकादायक इमारतीचा काही भाग यशस्वीरित्या पाडण्यात आला आहे. जनतेच्या सुरक्षिततेसाठी ही तातडीची आणि आवश्यक कारवाई करण्यात आली असून उर्वरित भागही लवकरच नोटीस देऊन पाडण्यात येईल. शहरात काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याठिकाणी उद्यान विभाग व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून झाडे हटवण्याचे काम सुरू असल्याचे महानगरपालिकेकडून सांगण्यात आले.

# नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन चालू वर्षाचा कर भरावा व दंड टाळावा

नगर – नवीन आर्थिक वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरासह बिले वाटप करण्यात आले आहे. महानगरपालिका अधिनियमानुसार एप्रिल महिन्यात सर्वसाधारण करावर १० टक्के सवलत दिली जाते. मात्र, यंदा ३१ मेपर्यंत सर्वसाधारण करावरील १० टक्के सवलत कायम ठेवण्यात आली आहे. शहरातील ३१७२७ मालमत्ताधारकांनी याचा लाभ घेऊन कर भरला आहे. सवलतीसाठी अखेरचे ३ दिवस शिल्लक राहिले असून, नागरिकांनी याचा लाभ घेऊन वेळेत कराचा भरणा करावा व दंड टाळावा, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

महापालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीला मागील आर्थिक वर्षात नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे विक्रमी वसुली झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार करात एप्रिलमध्ये १०%, मे व जूनमध्ये ८% अशी सर्वसाधारण करात सूट दिली जाते. या वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरानुसार बिले वाटप करण्यासाठी काही प्रमाणात विलंब झाला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात दिली जाणारी १०% सवलत अनेकांना मिळू शकली नाही. नवीन दरानुसार बिलांचे वाटप केल्याने काहींना उशिरा बिले मिळाली. त्यामुळे नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी मे महिन्यातही १० टक्के सवलत सर्वसाधारण करावर देण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षात २७ मे पर्यंत ३१७२७ मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेतला. त्यांना आत्तापर्यंत सुमारे ७० लाख रुपयांची सवलत देण्यात आली आहे. सवलतीसाठी आता तीन दिवस शिल्लक राहिले असून, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा व ३१ मे अखेरपर्यंत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे. दरम्यान, ज्यांना बिले मिळाली नसतील अशा नागरिकांनी त्यांच्या प्रभाग समिती कार्यालयात जाऊन बिल काढून घ्यावे व सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### विड्याचे पान खाण्याचे लाभ

नागवेलीची पाने म्हणजेच खाण्याचे पान किंवा विड्याचे पान आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. जेवणानंतर पान खाण्याचे अनेकजण शौकीन असतात, त्यामुळे तोंडाची चव वाढते. पान खाल्याने की तोंडातील अनेक जीवाणूंचा प्रभावीपणे सामना केला जातो ज्यामुळे तोंडाला दुर्गंध येत नाही. तसेच दात पोकळी, दात किडणे यांचा त्रास कमी होतो. जेवणानंतर पानाचा विडा किंवा नुसते पान चावून खाल्ल्याने आतड्या निरोगी राहतात. आरोग्यासोबतच ते सौंदर्य वाढवण्यातही फायदेशीर ठरते. विड्याचे पान उष्ण असल्या मुळे वात आणि कफ विकारांमध्ये ते उपयोगी आहे. घशामध्ये कफ साठून आवाज खरखरतो किंवा बसतो. अशा वेळी ज्येष्ठमध पावडर, कंकोळ, मिरी, कात घातलेले विड्याची पाने चावून चघळून खावीत. त्यामुळे घसा, कंठ साफ होतो.

## पाककला

### शेव पराठा

**साहित्य :** १ कप जाड शेव, २ उकडलेले बटाटे, १ लहान कांदा, ५-६ लसुन पाकळ्या, १ हिरवी मिरची, १ टे. स्पुन जीरा पावडर, चवीपुरते मीठ, १/४ स्पुन हळद, २ कप कणिक, २ टे. स्पुन बटर,

**कृती :** प्रथम कणिक मीठ व दही घालुन भिजवुन ठेवणे. नंतर शेव बारीक करुन घेणे उकडलेला बटाटा मॅश करुन त्यामध्ये कांदा, मिरची, लसुन, जीरे पावडर, मीठ घालुन वर कोथिंबीर मीक्स करुन गोळा करुन घेणे. कणकेचा गोळा घेऊन त्याला वाटीचा आकार करुन मध्ये बटाटा व शेवचे स्टफींग भरुन त्याचा पराठा लाटावा व तव्यावर बटर घालुन खमंग भाजावा व सॉस किंवा दह्या सोबत सर्व्ह करावा. किंवा चटणी अथवा काजू कुर्मासोबतही छान कॉम्बिनेशन जमते.

## वास्तू

### दक्षिणेला ठेवा या गोष्टी

* घराच्या दक्षिण दिशेला झाडू आणि सोने ठेवणे शुभ मानले जाते. तसेच, टीव्ही आणि इतर महागड्या वस्तू देखील दक्षिण दिशेला ठेवल्यास शुभ फळ मिळू शकते.

* ज्योतिषशास्त्रात झाडूला लक्ष्मीचे रूप मानले जाते, त्यामुळे तो दक्षिण दिशेला ठेवणे शुभ मानले जाते.

* घराच्या दक्षिण दिशेला सोने ठेवल्यास अनेक समस्यांवर मात करता येते.

* वास्तुशास्त्रानुसार, टीव्ही पाहणाऱ्या व्यक्तीचे तोंड दक्षिणेकडे असावे.

* दक्षिण दिशेला कोणतीही महागडी वस्तू ठेवल्यास त्याचे शुभ फळ मिळू शकते.

## सल्ला

भाजी बनवताना बटाटे किंवा वांग्याचा रंग बदलू नये यासाठी ते चिरल्यावर लगेच पाण्यात टाकावेत.

## सौंदर्य

* पिकलेली केळी थोड्या पाण्यात मिक्स करून घ्यावी. ते मिश्रण चेहऱ्यावर लावून २०-२५ मिनिटे ठेवावे. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावा. चेहऱ्यावर तजेला येईल.

* चमचाभर मध हातावर घेऊन चेहऱ्याला लावावे. मिनिटभर मधाने चेहऱ्याला मसाज करावे. यामुळे चेहरा स्वच्छ होवून चेहऱ्यावर ग्लो येऊन चेहरा चमकू लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २९ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, आर्द्रा २२।३९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३७ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** लोकांशी व्यवहार करताना सावधगिरी न बाळगल्याने नुकसान संभवते. भाऊबंद डोके वर काढतील. विवाहेच्छुकांचे विवाह जमतील.

**वृषभ :** अधिक श्रम करावे लागतील. पळापळ देखील अधिक राहील. वातावरण अनुकूल राहील. नोकरीविषयक मुलाखतीमध्ये यश मिळेल.

**मिथुन :** एखाद्या मित्राशी झालेली भेट दिलासा देईल. आर्थिक तोटा होईल. व्यवसायातील अनेक कामे मार्गी लागतील. कार्यालयीन कामानिमित्त परदेशगमन होईल.

**कर्क :** कौटुंबिक पाठिंबा देखील मिळणार नाही पण जिद्दीने व चिकाटीने कार्यरत रहाल. जुने मित्र भेटतील. जुने येणी वसुल होतील. क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घ्याल.

**सिंह :** आपणास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. महत्त्वाची कामे पूर्ण करू शकाल. एखादी महत्त्वाची वस्तू सापडण्यात वेळ जाईल.

**कन्या :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. धार्मिक कार्यामध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वैवाहिक सौख्य लाभेल.

**तूळ :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मानसिक स्थिती आल्हाददायक राहील. भावंडांमध्ये रमाल.

**वृश्चिक :** तब्येत बिघडेल. व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. यंत्रे, वाहने बिघडण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे.

**धनु :** मानसन्मानाचे योग येतील. व्यापार-व्यवसाय सुरळीत होत राहिल. परदेशागमनाचे योग आहेत. घरामध्ये शुभकार्य ठरतील.


**मकर :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल मात्र कापणे, खरचटणे असे छोटे मोठे अपघात घडतील. पैशासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** संभाषणात सावधगिरी न बाळगल्याने अडचणी याल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.


**मीन :** खर्च अधिक होईल. मनोबल व आत्मविश्वास वाढवणारी एखादी घटना घडेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१८७ सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७१८६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) पंचवीस टक्के; एक चतुर्थांश; पाव ४) न चुकणारे; रामबाण ६) घाण; विष्ठा ७) पाण्याने स्वच्छ करणे; धुणे ९) तेज; चकाकी; प्रकाश; लकाकी; मुरड; उसण ११) एक शस्त्र; समशेर १३) बरोबर; योग्य; बेताचे १४) वडील; बाप; जनक १५) जवान; युवक १७) तळे; सरोवर; जलाशय १८) कपट; कारस्थान; कट १९) तीन गुणांपैकी एक; धूळ २१) शंकराचे मंदिर २२) जंगलाला लागलेली आग; दावानल २३) हाताचा अंगठा व करंगळ ताणले असता पडणारे जास्तीतजास्त अंतर २४) अनेक जनावरे ज्याला बांधतात ती दोरी

**उभे शब्द :-** १) मसालेदार, खमंग; अघळपघळ २) फार बारीक व मऊ ३) राखण; राख; रखवाली ४) अग्नी ५) सर्कस वगैरेतील शरीराच्या विशिष्ट हालचाली; व्यायाम ८) वाईट सवय; खोड १०) सोपे नसलेले; अवघड १२) पृथ्वीच्या भोवतालचे हवेचे आवरण १६) ताडून पाहणे १७) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते धातूचे पात्र १८) विधी; नियम; लॉ २०) तरुण; युवक २१) अपशब्द; दुर्भाषण; वाईट शब्दांची लाखोली २२) जखम वगैरेचा त्वचेवर राहणारा डाग

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** पुस्तकांशिवाय केला जाणारा अभ्यास म्हणजे आयुष्य आणि आयुष्यात आलेले अनुभव म्हणजे पुस्तक होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### रक्ताचा रंग लाल, मग शिरा हिरव्या रंगाच्या का दिसतात?

रक्ताचा रंग हा लालच असतो. पण मग शिरांचा रंग निळा किंवा जांभळा का दिसतो, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. अर्थात त्यामागे नेमकं काय कारण आहे जाणून घेऊया. रक्त हा शरीरातला अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शरीरातील विविध अवयवांची कार्यप्रणाली सुरळीत ठेवण्यासाठी रक्त महत्त्वाची भूमिका बजावते. सर्वसामान्यपणे मानवी रक्ताचा रंग लाल असतो. परंतु, आपल्या शरीरातल्या शिरा निळ्या किंवा जांभळ्या रंगाच्या दिसतात. शिरांचा रंग निळ, जांभळा दिसत असला तरी त्यातून वाहणाऱ्या रक्ताचा रंग लालच असतो. त्यातच ऑक्सिजनयुक्त रक्ताचा रंग लाल असतो आणि विना ऑक्सिजन रक्ताचा रंगाचा निळा असतो, असा काहींचा समज आहे. पण तो हा समज खरा नाही. रक्ताचा रंग हा लालच असतो. पण मग शिरांचा रंग निळा किंवा जांभळा का दिसतो, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. अर्थात त्यामागे नेमकं काय कारण आहे जाणून घेऊया.

लाल रक्तपेशींमधल्या ऑक्सिजनयुक्त प्रोटिनला हिमोग्लोबिन असं म्हणतात. त्यातल्या प्रत्येक अणूमध्ये आयर्न अर्थात लोहाचे चार अणू असतात, जे लाल प्रकाश दर्शवतात. त्यामुळे आपल्या रक्ताचा रंग लाल दिसतो. रक्तातल्या ऑक्सिजनच्या पातळीनुसार लाल रंगाची छटा बदलते. मात्र खेकडा, झिंगा मासा, ऑक्टोपस आणि कोळ्याच्या रक्ताचा रंग हा निळा असतो. शिरा निळ्या, हिरव्या किंवा जांभळ्या रंगाच्या दिसणं हे एक प्रकारचं इल्युजन म्हणजे भास आहे. कारण शिरा त्वचेच्या पातळ थराखाली असतात.

### बालमुकुंद

कृत, त्रेता, व्यापार व कली या युगांची सर्व लक्षावधी वर्षे उलटली की एक देवयुग होते. अशी एकाहत्तर देवयुगे झाली की एक मन्वंतर होते. अशी अठ्ठावीस मन्वंतरे गेली की ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो व अशा रीतीने ब्रह्मदेवाची शंभर वर्षे लोटली की महाप्रलय होतो. महाप्रलयाच्या वेळी योगमायेच्या संगतीने सर्व प्राणिमात्रांच्या शक्ती एके ठिकाणी होतात. सूर्याचे तेज अनेक पटींनी वाढते. समुद्रातील वडवानल जागृत होतो व अशा तऱ्हेने भयंकर उष्णता निर्माण होते. अत्यंत प्रखर असा अग्नी निर्माण होऊन सर्व प्राणिमात्र मरून जातात. ब्रह्मांडात फक्त राख उरते. भयंकर वारा सुटून ही राख एका ठिकाणी होते. नंतर मुसळधार पाऊस पडून सर्वत्र पाणीच पाणी होऊन जाते.

महाप्रलयाच्या वेळी सर्व जलमय झाले असता मार्कंडेय ऋषी इकडेतिकडे फिरत होते. ते चिरंजीव असल्याने त्यांना या प्रसंगाची भीती नव्हती. पण दुसरा कोणताही प्राणी दृष्टीस पडेना त्यामुळे त्यांच्या मनाला फार उदासीनचा आली व त्यांनी त्या आदिशक्तीची प्रार्थना केली, मला एकदा तरी तुझे दर्शन घडू दे. त्याप्रमाणे एका वटवृक्षाच्या जवळ मार्कंडेय ऋषी आले असता पाण्याला लागून असलेल्या एका पानावर एक लहान मूल आनंदाने खेळत आपण अंगठा चोखीत असलेले त्यांना दिसले.

ते मुल म्हणाले, बाळा मार्कंडेया, कुशल आहेस ना? अंगठा चोखणाऱ्या एका तान्ह्या मुलाने आपणास 'बाळा' म्हणावे याचे मार्कंडेय यांना फार नवल वाटले.

किंचित रागाने ते म्हणाले, लाखो वर्षे जगून महाप्रलय पाहिलेल्या मला तू बाळ म्हणतोस? यावर वटपत्रावरील ते मूल खदखदा हसून म्हणाले, बाळ मार्कंडेया, मी असे अनेक महाप्रलय पाहिले आहेत. तुझ्या पित्याने चिरंजीव पुत्र मागून घेतल्याने तू आता आहेस. हे ऐकून मार्कंडेय म्हणाले, मला तुझी ओळख पटत नाही. तू कोण आहेस? मग ते मूल म्हणाले, मला मुकुंद असे म्हणतात. या त्रिभुवनाचा कर्ता, हर्ता मीच आहे. या महाप्रलयाची कथा सर्वांना कळावी म्हणून तू हिचा प्रसार कर. याप्रमाणे सांगून बालमुकुंद नाहीसा झाला.

## जीवन का अमृत (भाग १)



११. माफ करना और भूल जाना को हम अपने कर्मों, वचनों और विचारों में अवश्य धारण करें, ताकि ये हमारी रोजमर्रा की जिंदगी का हिस्सा बन जाए। प्रेम, निंदा करना, घमंड करना, थोपना या दूसरे में कमियाँ ढूंढना नहीं जानता, बल्कि यह रचनात्मक रूप से कार्य करके, सबको सत्गुरु के प्यार के बंधन में बाँध देता है। प्रेम हर वस्तु को सुंदर बना देता है।

तुम अपने कर्मों के फलों की चिंता न करो। उन्हें सत्गुरु पर छोड़ दो। उसके प्रति अपने प्यार को इतना विकसित करो कि हर कार्य में उसका हाथ देखकर तुम सभी प्रकार की दुश्मनी, शत्रुता और क्रोध की भावनाओं से ऊपर उठ जाओ।

उसे हर वस्तु में मौजूद देखो और याद रखो, वह हमेशा तुम्हारे साथ है, हमेशा तुम्हारी सहायता

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

के लिए तैयार है, चाहे जब भी तुम उसका ध्यान करो।

और इन सबसे बढ़कर याद रखो, उसे शब्दों से नहीं, बल्कि अपने कर्मों से जीता जा सकता है-यदि तुम मुझसे प्रेम करते हो, तो मेरा कहा मानो।

यदि तुम ऐसा कर सको; यदि तुम अपने अहम् को जीत सको और उसे सत्गुरु के चरणों में समर्पित कर सको, तो तुम उसे हर वस्तु में कार्य करता देखने लगोगे।

यदि तुम मान लो कि तुम्हारा नजरिया बहुत सीमित है; यदि तुम ध्यान लगाकर, हमेशा अपने कर्मों और विचारों पर कड़ी नजर रखो और हर कमी और अधूरेपन को उखाड़ फेंको, तो केवल तुम खुद ही मुक्त नहीं होगे, बल्कि दूसरों के लिए भी उदाहरण प्रस्तुत करोगे कि वे भी ऐसा ही करें।

तुम्हारा उदाहरण, अँधेरे में मशाल के जैसे चमकेगा और लोग, वे भी जो शुरु-शुरु में तुम्हारे विरुद्ध हो सकते हैं, तुम्हारे पास सहायता और मार्ग दर्शन के लिए आयेंगे।

तुम अपने आप में नई प्रकार की शांति का प्रवाह पाओगे; ऐसी शांति, जो कि बाहरी बाधाओं के ना होने पर निर्भर नहीं करती, बल्कि मन की ऐसी आंतरिक अवस्था है, जो कि सबसे ज्यादा लुभावनी परिस्थिति में भी अविचलित रहती है।

यह अवस्था केवल आपकी जिंदगी में ही नहीं आएगी, बल्कि उस बड़े आध्यात्मिक आंदोलन की जिंदगी में भी जाएगी, जिसका कि आप एक हिस्सा हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यदि सृष्टि के सभी पदार्थ एक धरातल पर आ जायें तो सम्पूर्ण सृष्टि के कार्य रुक जायें। सूर्य प्रतिदिन ठंडा होता जाये और वह अन्य ग्रहों जितना ठंडा हो जाये तो सम्पूर्ण सृष्टि रुक जायेगी। शक्ति निम्न से उच्च धरातल पर स्वयं नहीं जा सकती। अवश्य कोई व्यक्ति या शक्ति ऐसी होनी चाहिये जो सदैव धरातल में अंतर करती रहे। हम इस शक्ति को परमात्मा कहते हैं। आकाश (ईथर) हमारे विचार का माध्यम है। ईथर हमारे सारे शरीर में व्याप्त है। विचार को अज्ञात व दुर्बल वस्तु न माने। चुम्बकीय शक्ति आकाश से या दूसरे स्थानों से अनेक अनमोल चीजे खींच लेती है। जितनी चुम्बकीय शक्ति विचार में है इतनी शक्ति किसी अन्य वस्तु में नहीं है। संसार का कोई भी पदार्थ विचार के आकर्षण को नहीं रोक सकता। इसलिये नीले आकाश में मन की आंखो से भगवान को बिंदु रुप में देखते रहो। आप के अन्दर ईश्वर की शक्तियां आने लगेंगी। आप के सब दुख दर्द ठीक हो जायेंगे। आप की आत्मिक बैटरी पूर्णतया

### विशुद्ध ऊर्जा चक्र

चार्ज हो जायेगी। ऐसे ही दूसरे व्यक्तियों के बारे सोचें वह भी नीले आकाश के पीछे स्थित भगवान के बिंदू रूप से शक्ति ले रहे हैं तो आप के इस विचार से उन लोगो को भी बल मिलने लगेगा। उन की सब कमी कमजोरियां समाप्त हो जायेगी। इसे कहते हैं मानसिक उपचार। ये उपचार / विचार हर समय करते रहना ही वर्तमान संसार की सब से बडी सेवा है। नीले आकाश के पीछे सूक्ष्म सितारे के समान एक सूर्य है जिस के प्रकाश से आकाश और सारा संसार प्रकाशित हो रहा है। वही भगवान है। वह शांति का सागर है, प्रेम का सागर है। आदि आदि उसके गुण मन में रिपीट करते रहो। यही सहज योग है।

आकाश ईथर -४ - आकाश की व्यवस्था और कुछ नहीं एक सिस्टम है, एक नेटवर्क है, एक सर्किट है। यह आकाश एक ऐसे तत्व से बना है जो सूक्ष्मतम बिरलतम, तेजतम, तीव्रतम गतिशीलता से युक्त है, स्वयं चेतन और परम तत्व है। आकाश परमपिता परमात्मा का संचार तंत्र है। परमपिता एक बिंदु के समान है जिस से अनंत बल उत्पन हो रहा है। परमपिता ने ऐसी व्यवस्था कर रखी है जिस से सारा ब्रह्मांड आटोमेटिक काम कर रहा है। इस संसार का हरेक व्यक्ति, जीव व पदार्थ एक सर्कट है। यह सर्कट मनुष्य की रीढ़ की हड्डी में है। रीढ़ की हड्डी में उर्जा चक्र हैं जो शरीर के भिन्न-भिन्न भागों वा संसार से जुड़े हुये हैं। इन उर्जा चक्रों में विद्युत प्रवाहित होती रहती है जिस से व्यक्ति जीवित है। रीढ़ की हड्डी के सबसे नीचे वाले मनके जिसे मूल आधार कहते हैं इसे दक्षिणी ध्रुव कहते हैं एक दूसरा चक्र जो कि सिर में है उसे सहस्रार चक्र कहते हैं, इसे उत्तरी ध्रुव भी कहते हैं। उत्तरी ध्रुव में धनात्मक विद्युत बनती है और दक्षिणी ध्रुव में नकारात्मक विद्युत बनती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर (संताला) : सांगण्यास वाईट वाटतंय कि, तुमची एक किडनी फेल झाली आहे! हे ऐकल्यावर संता खूप रडतो मग तो शांत होऊन डॉक्टरांना विचारतो 'किती गुणांनी?'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी संमेलनाचे स्वागत अध्यक्षपदी कोणाची निवड झाली आहे? - शरद पवार

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

उपचार -

सायरप-टेम्पॅनील नवजात बालकास २ मि.लि तीन वेळा, तर एक वर्षापुढील बालकास ५ मि.लि. तीन वेळा द्यावे. त्यासोबत सायरप-कासनी नवजात बालकास २ मि.लि. तीन वेळा. तर एक वर्षापुढील बाळास ५ मि.लि. तीन वेळा द्यावे. बालकांची प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी सायरप-इम्युनोसिन दिवसातून तीन वेळा वरीलप्रमाणेच द्यावे. तालिसादिचूर्ण आणि सितोपलादी चूर्ण एकत्र करून मधातून एक बोट चाटण तीन वेळा द्यावे. आहार - सर्दी-खोकला झाल्यानंतर नाक चोंदल्या मुळे बालकाला स्तनपान करणे अवघड होते. अशा वेळी त्याला श्वास घेणे सोपे जावे, म्हणून चोंदलेले नाक साफ करून स्तनपान घेण्यास बालकास उद्युक्त करावे. कारण स्तनपानामुळे बालकाचे अनेक रोगांपासून संरक्षण होते. बालकाला जंतुसंसर्गाचा सामना करण्यासाठी त्याची रोगप्रतिकारक शक्ती

### बालकांचे आजार

वाढणे आवश्यक असते व ही शक्ती त्याला स्तनपान केल्याने प्राप्त होते.

बाळाला स्तनपान करणे जमत नसेल, तर त्याला स्तन पिळून त्यातील दूध वाटी चमचाने पाजावे. सहा महिन्यांच्या पुढील बाळाला स्वच्छ, ताजी, सकस पेज, सूप, सामान्य तापमानातील गोड फळांचा रस थोड्या-थोड्या अंतराने देत राहावा. बालक आजारातून बरे झाल्यानंतर त्याचे वजन पर्ववत होण्यासाठी पढील काही दिवस नेहम पेक्षा एक वेळा अधिक अन्न द्यावे व त्यासोबत भरपूर उकळून गार केलेले पाणी पाजावे.

बालकाला सर्दी-खोकला झाल्यानंतर उबदार कपडे वापरावेत. बालकाला गार वारा लागणार नाही, याची काळजी घ्यावी. त्याच्या खोलीतील वातावरण उबदार ठेवावे. खोलीतील हवा खेळती राहण्यासाठी अधूनमधून थोडा वेळ खिडकी उघडावी. बाळाला ओव्याची धुरी द्यावी. थंडगार आईस्क्रीम, कोल्ड्रिंक, बिस्किटे, चॉकलेट हे पदार्थ बाळाला देण्याचे टाळावे. गर्दीची ठिकाणे, सिनेमा थिएटर यामध्ये बालकाला घेऊन जाऊ नये. कारमधून प्रवास करताना काचा लावून घ्याव्यात. या काळात बाळाला डोक्यावरून अंघोळ घालू नये. चार महिन्यांच्या पुढील बालकाला तुळशी, पुदिना यांची चार-पाच पाने, आवळा पावडर पाव चमचा उकळून त्यात थोडी साखर टाकून हे मिश्रण गाळावे व थोड्या अंतराने पाजत राहावे. अगदी नवजात बालकालाही हे पेय पाजू शकता. फक्त ते पाजताना स्वच्छतेची काळजी जास्त प्रमाणात घेणे आवश्यक आहे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला ४ कोटी १५ लाखाचा विक्रमी निव्वळ नफा

नगर – श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला सर्व प्रकारच्या तरतूदी वजा जाता ३१ मार्च २०२५ अखेर रु.४.१५ कोटी रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा झाला आहे. तसेच संस्थेकडे वर्ष अखेर रु.८३.६२ कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्ज वितरण रु.५७.६० कोटी रुपयांचे झाले आहे. अशी माहिती संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी दिली.



श्रीगोपाल धूत | किसनलाल बंग | राजेंद्र मालू

संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच किसनलाल बंग यांचे अध्यक्षतेखाली पार पडली संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक सी.ए. एन.जे.लोहे अँड कंपनीचे सी.ए. पुनीत व्होरा यांनी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर केला. सभेला श्रीगोपाल धूत, व्हा.चेअरमन राजेंद्र मालू, राजेंद्र गुजराथी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, प्रकाश गांधी, विश्वनाथ कासट, गोपाल मणियार, मधुसूदन सारडा, राजेंद्रकुमार कंत्रोड, अ‍ॅड. अशोक बंग, अनुराग धूत, राजकमल मिनियार, शोभा राठी, अनुरिता झगडे, देवराव साठे, साईनाथ कावट, तसेच व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व ओ.एस.डी कुमार आपटे उपस्थित होते. चेअरमन किसनलाल बंग व व्हा.चेअरमन राजेंद्र मालू तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षात कार्यरत असेलेले चेअरमन श्रीगोपाल धूत, गोपाल मणियार आणि व्हा. चेअरमन ओमप्रकाश चांडक व मधुसूदन सारडा यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

चेअरमन किसनलाल बंग म्हणाले की, संस्थेने इतर बँकेत ८१.०२ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे. रिझर्व्ह फंड व इतर निधी ३४.८० कोटी रुपये उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या नेट एन.पी.ए. नेहमी प्रमाणे शून्य आहे. संस्थेचे संस्थापक संचालक श्रीगोपाल धूत यांचे बहुमोल मार्गदर्शन, शिस्तबध्द व उत्कृष्ट कार्यपद्धती व्हा.चेअरमन राजेंद्र मालू व सर्व संचालकांचे योगदान यामुळेच संस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच भरीव कार्य करता आले असेही त्यांनी संगितले. यावेळी सी.ए. पुनीत व्होरा यांनी संस्थेला वेळोवेळी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल त्यांचे, संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांचे हस्ते पुष्प गुच्छ देऊन आभार मानण्यात आले.

संस्थेकडून अल्पदरात कॅशक्रेडिट कर्ज, टर्म लोन, वाहन कर्ज आणि सोने तारण कर्ज फक्त ७% व्याजदराने दिले जाते. याचा सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले. संचालक मंडळाचे सभेत संचालक लक्ष्मीकांत झंवर, राजेंद्र गुजराथी, ओमप्रकाश चांडक, मधुसूदन सारडा, अनुराग धूत, गोपाल मणियार यांनी संस्थेच्या वाटचालीकरिता व प्रगतीकरिता विचार व्यक्त केले. सभेच्या शेवटी व्हा.चेअरमन राजेंद्र मालू यांनी आभार मानले.

# श्रीरामपूरचे निरज मुरकुटे यांना सिडनी विद्यापीठातून पदवी प्रदान

श्रीरामपूर – ऑस्ट्रेलिया मधील सिडनी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या पदवीप्रदान समारंभात निरज मुरकुटे यांना बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स अ‍ॅण्ड अकाउंटिंग ही पदवी प्रदान करण्यात आली.




चि.निरज यांनी आपल्या आत्मविश्वासपूर्ण उपस्थितीने आणि शैक्षणिक गुणवत्ता दाखवत विविध देशांतील विद्यार्थ्यांमध्ये विशेष ओळख निर्माण केली. ऑस्ट्रेलिया-मध्ये उच्च शिक्षण पूर्ण करत विद्यार्थ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी केवळ उत्तम प्रकारे शिक्षण घेतले नाही, तर जागतिक पातळीवर आपल्या प्रतिमेची छापही सोडली आहे. चि.निरज मुरकुटे यांचे पूर्व प्राथमिक शिक्षण बाल आनंद मंदिर तर प्राथमिक श्रीरामपूर श्रीराम अ‍ॅकॅडमीमध्ये पूर्ण झाले. तर माध्यमिक शिक्षण अशोक आयडियल स्कूल व पुण्याच्या बिशप स्कूलमध्ये झाले. तसेच उच्च माध्यमिक राजीव गांधी कॉलेज ऑफ ई लर्निंग या महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियामधील सिडनी विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. चि.निरज हे सध्या अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा सामाजिक वारसा देखील उल्लेखनीय आहे. या पदवीप्रदान समारंभाच्या निमित्ताने त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, दूरदृष्टी आणि अभ्यासातील निष्ठेला योग्य असा सन्मान मिळाला आहे.

चि.निरज हे माजी आ.भानुदास मुरकुटे यांचे नातू आहेत.

# आमदार संग्राम जगताप यांना शहराच्या स्थापनादिनानिमित्त तिरंगा फोटो फ्रेम भेट

नगर – शहराला सांस्कृतीक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. शहराचा बुधवारी ५३६ वा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना किल्ल्याजवळ असलेल्या सर्वात मोठा तिरंगा ध्वजाची फोटो फ्रेम स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी भेट दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाशहराध्यक्ष अमित खामकर उपस्थित होते. स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून शहर स्थापनादिनानिमित्त हा उपक्रम राबवण्यात येत आहे.



शहराच्या स्थापनादिनानिमित्त आ. संग्राम जगताप यांना तिरंगा फोटो फ्रेम भेट देताना 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाशहराध्यक्ष अमित खामकर

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, निजामशाहीचा संस्थापक अहमदनिजामशहा याने २८ मे १४९० मध्ये सीना नदीकाठी अहमदनगर शहराची स्थापना केली होती. निजामशाहीच्या काळात अहमदनगर दक्षिण भारताचं मुख्य प्रवेशद्वार मानले जायचं. तेव्हा आजचा दोन तृतियांश महाराष्ट्र निजामशाहीच्या ताब्यात होता. येथील स्थापत्य कला आणि जलव्यवस्थापनही विशेष प्रसिद्ध होते, असे डॉ. शिंदे म्हणाले.

स्नेहबंधच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलिस अधीक्षक राकेश ओला, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांनाही ही फोटो फ्रेम भेट देण्यात आली.

### शहराला पूर्वीचे वैभव मिळावे : डॉ. उद्धव शिंदे

खापरी नळ योजना, जलमहाल आणि कारंजी हे एकेकाळी या शहराचं वैभव होतं. काळाच्या ओघात हे जलवैभव लोप पावले असले तरी त्याच्या खाणाखुणा अजूनही कुठेतरी दिसतात. शहराच्या पूर्वेला दहा किलोमीटरवर नगर-पाथर्डी रस्त्यावर ९०० फूट उंचीच्या शाह डोंगरावर अष्टकोनी चांदबिबी महाल आहे. एकेकाळी उद्यानं, तलाव, कालवे आणि कारंजांसाठी हे शहर प्रसिद्ध होते. ते वैभव या शहराला मिळावे, अशी अपेक्षा डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

# राष्ट्रसंत भगवान बाबांची जयंती आणि पुण्यतिथी महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे साजरी करावी

नगर – राष्ट्रीय जयंती उत्सव समिती (वंजारी समाज) व वंजारी समाजसेवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्यकारिणीची बैठक नुकतीच २५ मे रोजी पुणे येथे झाली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष शशिकांत घुगे, राष्ट्रीय सचिव तुकाराम सांगळे, प्रदेशाध्यक्ष डॉ. एकनाथ ढाकणे, कार्याध्यक्ष नामदेव सानप, शामराव गीते, राष्ट्रीय कोषाध्यक्ष मल्हारी खेडकर, राज्य सचिव मायाताई बुरकुल, राष्ट्रीय उपाध्यक्ष किसन नांगरे, बाबासाहेब ढाकणे, राष्ट्रीय पदाधिकारी आदींसह समाजबांधव उपस्थित होते.



राष्ट्रीय जयंती उत्सव समिती (वंजारी समाज) व वंजारी समाजसेवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्यकारिणीची बैठक पुणे येथे झाली.

राज्यस्तरीय बैठकीच्या अध्यक्षस्थानी एकनाथ ढाकणे उपस्थित होते. यावेळी राज्यातील जिल्हा विभाग राज्यस्तरीय तालुका सचिव पदाधिकारी यांची निवड पत्र देऊन सन्मान करण्यात आला. बैठकीत प्रामुख्याने राष्ट्रसंत भगवान बाबांची जयंती आणि पुण्यतिथी महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे साजरी करावी, याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला, तो राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. समाजातील संघटन चळवळ भक्कम करण्यासाठी जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय तालुकास्तरीय शाखा निर्माण करून भविष्य काळामध्ये समाजाचे ऊस तोडणी कामगारांचे शैक्षणिक बाबत विद्यार्थ्यांचे वस्तीग्रहांचे आरक्षणाचा प्रश्न असेल तसेच होऊ घातलेल्या राष्ट्रीय जनगणनेचा प्रश्न, हुंडाबळीचा प्रश्न, सामुदायिक विवाह असे अनेक समाजातील चळवळीचे प्रश्न असतील हे अजिंठावर घेऊन हे अग्रक्रमाने न्याय हक्काने समाजासमोर मांडून संघर्षशील धोरण स्वीकारून महाराष्ट्रभर जनजागृती करणार. वेळप्रसंगी समाजाच्या प्रश्नासाठी न्याय हक्कासाठी संघर्ष सरकार बरोबर करण्याची वेळ आली तर निश्चितपणे संघर्ष उभा करण्याचा एकमुखी ठराव. राज्य कार्यकारणीच्या बैठकीमध्ये एकमताने संमत करण्यात आलेला आहे आणि त्याचे अनुपालन राज्य कार्यकारणी भविष्याच्या कालखंडामध्ये निश्चितपणे करेल असा आशावाद व्यक्त करण्यात आला. राजकारण विरहित संघटना महाराष्ट्रामध्ये आणि देश पातळीवर काम करणारे राष्ट्रीय जयंती उत्सव मंडळी समाज सेवा प्रतिष्ठान या ठिकाणी अधिकृतपणे घोषणा केली समाजाच्या संघटनासाठी शेवटच्या घटकापर्यंत आम्ही कार्यरत राहणार आहे.

समाजाने फक्त हिंदू वंजारी हाच शब्द प्रयोग करावा तसेच पोट जाती वाढीव भाऊ ही पद्धत बंद करण्यात यावी. संपूर्ण राज्यभर सभासद नोंदणी व सॉफ्टवेअर बनवण्याची जबाबदारी पुणे येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर यांनी घेतली आहे, असा एकमुखी ठराव करण्यात आला तसेच उद्योजक भरजी गीते, परळी यांनी परिश्रमातून महाराष्ट्रभर उद्योग क्षेत्रात उंच भरारी घेऊन अनेक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन स्वतःच्या पायावर उभे केलेले असे ग्लोबल उद्योजक यांचा संघटनेच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन यशस्वी सन्मान करण्यात आला.

पहलगाम येथील पर्यटकावर भ्याड हल्ल्याचा निषेध करून शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेऊन निर्णायक लढा भारत सरकारने संरक्षण दलाने दिल्याबद्दल अभिनंदन ठराव पारित करण्यात आला. बैठकीच्या सभेचे संयोजन आणि आभार प्रदर्शन शामराव गीते यांनी केले. सभेची राष्ट्रगीताने सांगता झाली.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या तालुका अध्यक्षपदी आप्पासाहेब केदारे व जिल्हा कार्याध्यक्ष महेश शिंदे

नगर – राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब केदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर तालुका अध्यक्ष आप्पासाहेब केदारे व जिल्हा कार्याध्यक्ष महेशकुमार शिंदे यांची निवड करून निवडीचे पत्र देण्यात आले.



कार्याध्यक्ष महेशकुमार शिंदे

नगर तालुका अध्यक्ष आप्पासाहेब केदारे व जिल्हा यांचा जनसंपर्क दांडगा असल्याने तसेच समाजसेवा करत असल्याने व चर्मकार समाजाच्या नागरिकांचे अनेक प्रश्न सोडवलेले आहे. त्यामुळे ही नियुक्ती करण्यात आली. तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून चर्मकार समाजाच्या अनेक समस्या सोडवणार असून लवकरच चर्मकार समाजातील युवक व युवतींसाठी नोकरी मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात येणार असल्याची भावना व्यक्त केली.

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिकमार्फत डॉ. कैलास सदगीर यांना पीएच.डी. पदवी प्रदान


नगर – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक द्वारे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर अधिव्याख्याता कैलास दत्तू सदगीर यांना शिक्षणशास्त्र या विषयांमध्ये विद्यावाचस्पती पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी इमरटस प्रो. डॉ. कविता साळुंखे शिक्षण शास्त्र, संचालक स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग आणि प्रोफेसर राम दाखवले व संशोधन विकसन केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही पीएचडी पूर्ण केली आहे.



पीएच.डी. प्रदान केल्याबद्दल डॉ. कैलास सदगीर, अधिव्याख्याता यांचे डॉ. संजीवनी महाले संचालक शिक्षण शास्त्र विद्याशाखा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांनी अभिनंदन केले.

# माऊंट एव्हरेस्ट डे २९ मे १९५३





२९ मे १९५३ मानवी इतिहासातील विशेषतः गिर्यारोहण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. एकेकाळी शिखर क्रमांक १५ अशी ओळख असलेला जगातील सर्वोच्च व सर्वात कठीण असा शिखर माऊंट एव्हरेस्ट दोन जिगरबाज गिर्यारोहकांनी मोठ्या परिश्रमाने सर केला. ते दोघेही कायमचे इतिहासात अजरामर झाले – सर एडमंड हिलरी आणि त्यांच्या सोबत नेपाळचे धाडसी शेर्पा तेनझिंग नोर्गे. त्यांच्या या परक्रमाची गाथा त्यावेळी जगभर वाऱ्यासारखी पोहोचली. अनेकांनी मोठ्या मंचावर त्यांचे जंगी स्वागत करून त्यांना सन्मानित केले. विशेषतः गिर्यारोहण क्षेत्रातील आवड असलेल्या प्रत्येकालाच प्रेरणा मिळत रहावी या अनुषंगाने २९ मे हा एव्हरेस्ट दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला. या ऐतिहासिक क्षणाची आठवण प्रत्येकाच्या मनामध्ये रुजावी म्हणून व गिर्यारोहण क्षेत्रात कार्य करणाऱ्या भावनांचा आदर करण्याच्या दृष्टीने हा दिवस साजरा केला जातो.

गिर्यारोहण अर्थात मॉन्टेनरिंग याला इंग्रजीमध्ये मदर ऑफ ऑल एडवेंचर्स असे म्हटले जाते. एखादे हिमालयातील शिखर सर करण्यासाठी अतिशय कष्टाची पराकाष्ठा गिर्यारोहकाला करावी लागते. लहरी हवामान, निर्दयी निसर्ग, वेगाने वाहणारा वारा, शिखरांवर होणारे हिमस्खलन व त्यामुळे शिखरावरून खाली येणारे बर्फाचे मोठे गोळे, माउंटन सिकनेस (शिखरावर उद्भवणारे अनेक आजार), हिमदंश, मेटल बाईट, अशा अनेक संकटाचा सामना गिर्यारोकांना हाय अल्टिट्यूट अर्थात उंचीच्या भागात करावा लागतो. अनेक आव्हानांना सामोरे जाऊन गिर्यारोहक शेवटी आपले ध्येय मोठ्या हिमतीने गाठतात तर काही गिर्यारोहकांना काळ मध्येच गाठतो व त्यांचे स्वप्न अपूर्ण राहते.

माऊंट एव्हरेस्ट वर किंवा कोणत्याही आठ हजार मीटरच्या वरील शिखरावर जाणे हे अतिशय धोकादायक मानले जाते. ८००० मीटर वरील भागात ऑक्सीजन लेवल सुद्धा कमी असते, त्यामुळे याला देथ झोन म्हणून संबोधले जाते. शिखरावर चढाई करण्यासाठी शारीरिक व मानसिक अशा दोन्ही पद्धतीचे प्रशिक्षण गिर्यारोहकाने घेणे आवश्यक असते. जेणेकरून अतिशय कठीण पर्वत रांगातून ते शिखराच्या दिशेने मार्गक्रमण करू शकतात. हिमालय अतिशय विस्तीर्ण व भौगोलिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे, असे ठिकाण आहे. अनेक भारतातील नद्यांचे उगमस्थान देखील आहे. पण अलीकडे अनेक शिखरांवर चढाई करताना गिर्यारोहक आपल्या सोबत आणलेले सामान शिखरावर सोडून देतात, त्यामुळे मोठा घन कचरा शिखरांवर साचून राहत आहे. अशा गोष्टीमुळे निसर्गाची मोठी हानी होत आहे.

दरवर्षी विविध देशातील गिर्यारोहक माउंट एव्हरेस्टच्या चढाईसाठी नेपाळमध्ये येतात. एव्हरेस्टच्या अवघड व तांत्रिक चढाईसाठी शेर्पा अर्थात हिमालयातील वाटाड्या त्यांना भरपूर मदत करतो. कठीण भागातून मार्ग काढणे, रोप फिक्सिंग करणे, वेळ प्रसंगी गिर्यारोहकाचे बचाव कार्य करणे, त्याच्यासाठी जेवण तयार करणे, पाठीवर ओझे वाहणे इ. केवळ त्यांच्या सहकार्याने अनेक गिर्यारोहकांनी आपली स्वप्नपूर्ती आजवर केली आहे.

इतिहासामध्ये असे अनेक दाखले आहेत जिथे माउंट एव्हरेस्टच्या चढाई दरम्यान अनेकांना आपला जीव गमवावा लागला. तरीसुद्धा गिर्यारोहणा क्षेत्रामध्ये येणारे व्यक्ती आपल्या क्षमता तपासण्यासाठी तर काहीजण छंद म्हणून गिर्यारोहण क्षेत्रामध्ये स्वतःला झोकून देताना दिसतात. काही गिर्यारोहकांचे तर हिमालय हे अक्षरशः दुसरे घर बनले आहे. दरवर्षी एप्रिल – मे महिन्याच्या दरम्यान गिर्यारोहकांची ही पंढरीची वारी माऊंट एव्हरेस्टच्या दिशेने मार्गक्रमण करत असते फक्त शिखर सर करण्याच्या उद्देशाने. ८८४८ मीटर उंच हे शिखर जवळपास सर्वच गिर्यारोहकांचे स्वप्न असते. या शिखराला अनेक जण सागर माथा या नावाने सुद्धा ओळखतात. नेपाळी व तिबेटी भाग मध्ये याला चोमोलुंगमा असे नाव दिले गेले आहे.

माऊंट एव्हरेस्ट दक्षिण व उत्तर बाजूने सर करता येऊ शकतो. अर्थात त्याच्या दोन वाटा गिर्यारोहकां मध्ये प्रचलित आहेत. दक्षिण बाजू ही नेपाळच्या दिशेने आहे आणि उत्तर बाजू पेक्षा ही बाजू तुलनात्मक दृष्ट्या चढाईसाठी सोपी मानली जाते. उत्तर बाजू ही तिबेटच्या बाजूने आहे. काही गिर्यारोहक उत्तर बाजूने सुद्धा चढाई करतात, त्याला नॉर्थ फेस असेही म्हटले गेले.

माऊंट एव्हरेस्ट चा परिसर अनेकांसाठी विलोभनीय दृश्याने भरलेला आहेच पण काही लोकांसाठी माऊंट एव्हरेस्ट हे आपल्या शारीरिक व मानसिक क्षमता तपासण्याचे एक परिमाण आहे, असे म्हणावयास हरकत नाही. आठ हजार मीटर वरील कोणत्याही शिखरावर चढाई करणे अत्यंत धोकादायक तर असतेच कारण येथे ऑक्सिजनची मोठ्या प्रमाणावर कमतरता जाणवते मुळे अनेक गिर्यारोहकांना आपले प्राण गमवावे सुद्धा लागते. जगातील हे सर्वोच्च शिखर अनेक कथांनी समृद्ध असे आहे. या माउंट एव्हरेस्टवर अनेक डॉक्युमेंटरी तसेच चित्रपट सुद्धा काढण्यात आलेले आहेत. कामी रीटा शेर्पा या ५५ वर्षीय साहसी शेर्पा ने ३१ वेळा माऊंट एव्हरेस्टचे शिखर सर केले आहे. नुकतेच त्यांनी ३१ वेळा शिखर सर केल्याचे वृत्त अनेक वृत्तपत्रातून जगभर पोहोचले. लक्पा गेलु शेर्पा याने जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट हे १० तास व ५६ मिनिटातच सर करून एक वेगळा कीर्तीमान रचला. जॉर्डन रोमेरो या अमेरिकन गिर्यारोहकाने वयाच्या तेराव्या वर्षी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केल्याचे ऐकवते.

१९७५ मध्ये जुन्को ताबेई ही जपानी महिला माऊंट एव्हरेस्ट सर करणारी जगातील सर्वप्रथम गिर्यारोहक ठरली. तर भारतीय इतिहासामध्ये बछेंद्री पाल यांनी १९८४ मध्ये जगातील सर्वोच्च शिखर सर केले व माऊंट एव्हरेस्टवर जाणाऱ्या प्रथम भारतीय महिला असल्याचा बहूमान त्यांनी प्राप्त केला. आजही महाराष्ट्र मधून अनेक गिर्यारोहक माउंट एव्हरेस्टच्या चढाईसाठी जात असतात. यामध्ये अनेक गिर्यारोहकांनी स्वतःचे नाव इतिहासामध्ये आजारावर केले. पुण्यातील गिरीप्रेमी या अत्यंत नावाजलेल्या संस्थेतील प्रसाद जोशी, आशिष माने, भूषण हर्षे, रुपेश खोपडे, कृष्णा ढोकळे, गणेश मोरे, आनंद माळी, सुरेंद्र जाहलीहल, टेकराज अधिकारी, राहुल येळंगे, चेतन केतकर अश्या साहसी टीम ने २०१२ मध्ये माऊंट एव्हरेस्ट सर केले.

माझ्या परिचयातील पुण्यातील अपर्णा प्रभुदेसाई मॅडम, छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा संचालक मनीषा वाघमारे मॅडम, सोलापूर मधील आनंद बनसोडे, सुविधा कडलग मॅडम, लखनऊ येथील अरुणिमा सिन्हा, पुण्यातील सुरेंद्र चव्हाण सर, भगवान चौवले, सिंहगडाच्या दर्या खोऱ्यात वाढलेला लहू उघडे, असे अनेक गिर्यारोहकांनी भारताचा भगवा जगाच्या पाठीवर असलेल्या सर्वोच्च शिखरावर गर्वाने फडकवला.

गिर्यारोहणाची आवड निर्माण झाल्यापासून आज पर्यंत अनेक एवरेस्ट वीरांना मला समक्ष भेटता आले व त्यांच्याकडून अनेक रोमांचकारक गोष्टी ऐकण्याचे भाग्य लाभले. जगातील सर्वोच्च शिखर अनेक नवोदित गिर्यारोहकांना सदैव आकर्षित करत राहील व अनेक गिर्यारोहक आपल्या सहसाने असे अनेक शिखरे सर करत राहतील यात काही शंका नाही.



– **भरत नंदकुमार झंवर,** अहिल्यानगर
(गिर्यारोहक, मॅरॅथॉन रनर, सायकलिस्ट)
नव हिम सह्याद्री ट्रेकर्स,
मोबा. ९५९५२२२६३०

# मंगलदीप मल्टीस्टेट संस्थेस दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी १ महिना कैद व ४७ हजार रुपये दंड देण्याचा आदेश

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. १९. डी. डी. कर्वे यांनी आरोपी मार्या पेत्रस जाधव यांना २ महिन्यांचा साधा कारावास व रक्कम रु. सत्तेचाळीस हजार रुपये दंड देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. आरोपी मार्या पेत्रस जाधव यांनी फिर्यादी सोसायटी मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को.ऑप. क्रे.सोसायटी ली. एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर यांचे कडून कर्ज घेतले होते, त्याचे परताव्या पोटी त्यांनी सोसायटीस धनादेश दिलेला होता. सदर धनादेश न वटल्याने फिर्यादी सोसायटीने त्यांचे विरुद्ध न्यायालात प्रकरण दाखल केले होते, त्या प्रकरणामध्ये कोर्टाने आलेल्या पुराव्याचा विचार करून आरोपींना एक महिन्याचा साधा कारावास व रक्कम रु. सत्तेचाळीस हजार रुपये दंड व दंड रक्कम न भरल्यास पंधरा दिवसांचा साधा कारावास अशी शिक्षा देण्याचा आदेश कोर्टाने केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी सोसायटीचे वतीने अ‍ॅड. अमित विजय राशिनकर यांनी काम पहिले व त्यांना अ‍ॅड. मिलिंद घोरपडे यांनी सहकार्य केले. तसेच फिर्यादी सोसायटीचे वतीने माहीतगार इसम म्हणुन सागर फूलारी यांनी साक्ष दिली.

# सेशन कोर्टातून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – सिंधी कॉलनी येथील गुरुनानक ड्रायफ्रुट दुकानाचे पाठीमागील बाजुस २५.०८.२०२१ रोजी राकेश तेजभान कंत्रोड हा त्याचे राहते घरात महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेला तसेच शरीरास अपायकारक होईल असा गुटखा व पानमसालाची चोरुन विक्री करत आहे. सदर ठिकाणी तात्काळ छापा टाकून कायदेशीर कारवाई केली असता सदर ठिकाणी सुमारे रु. ४५,००० किंमतीचे सुगंधी तंबाखु जप्त केली. असे फिर्यादी शैलेश उत्तमराव गोमसाळे यांनी तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. त्यानंतर तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलिसांनी सुगंधी तंबाखुचे नमुना तपासण्यासाठी अहमदनगर येथील लेबोरेट्रीमध्ये पाठविले. रिपोर्टप्रमाणे आरोपीच्या विरुध्द आयपीसीचे कलम २७२,२७३, ३२८ प्रमाणे कोर्टात केस दाखल केली. या केसची चौकशी अ‍ॅडि. सेशन जज्ञ महेश एस. तिवारी यांच्या कोर्टात झाली.

सरकारी वकील यांने आपले म्हणण्यामध्ये सांगितले व शिक्षेची मागणी केली. आरोपीचे वकील अ‍ॅड. एन. जी. खान यांनी आपले म्हणणेमध्ये सांगितले की, सरकारने कायद्याचा पालन केले नाही. त्यामुळे आरोपी नामे राकेश तेजभान कंत्रोड विरुध्द कोणताही पुरावा सिध्द झाला नाही. सदर आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

आरोपीतर्फे एन. जी. खान यांनी काम पाहिले.

# दुर्मिळ वस्तू स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याचा योग येतो त्या उत्साह व आनंदाला सीमा नसते

## युनूसभाई तांबटकर यांचे प्रतिपादन; मखदुम सोसायटीतर्फे संग्राहक सचिन डागा यांच्या दुर्मिळ नाणी, नोटा, स्टॅम्प प्रदर्शनास प्रतिसाद

नगर – शिक्षण घेत असतांना सर्व आपल्या शिक्षकांकडून इतिहासाबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकत असतात. तसेच त्या काळातील दैनंदिन जीवनात वापरल्या जाणारे नाणी, तसेच सनदी, वस्तू, त्या काळातील बोल्या जाणाऱ्या वेगळ्या भाषा व त्यातील व्यवहार अशा अनेक बाबीबद्दल सर्वांना जाणून घेण्याची उत्सुकता असते. जेव्हा या सर्व दुर्मिळ वस्तू स्वतःच्या डोळ्यांनी बघण्याचा योग येतो तर उत्साहला व आनंदाला सीमा नसते, असे प्रतिपादन रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर यांनी केले.



शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त रहमत सुलतान हॉल सर्जेपुरा मध्ये दुर्मिळ नाणी, नोटा, पोस्टल तिकिट व नवीन चलनातील नाणी व नोटांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.


मखदूम एज्युकेशन अॅण्ड वेलफेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन, इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त रहमत सुलतान हॉल सर्जेपुरा मध्ये दुर्मिळ नाणी, नोटा, पोस्टल तिकिट व नवीन चलनातील नाणी व नोटांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून युनूसभाई तांबटकर, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर, उर्जिता फाऊंडेशनच्या सौ. संध्या मेढे, क्वाईन संग्राहक सचिन डागा, गडकिल्ले अभ्यासक ठाकूरदास परदेशी, एमआयएम जिल्हा अध्यक्ष डॉ. परवेज अशरफी, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद शफकत, क्वाईन संग्राहक पंकज मेहेर, आर्किटेक्ट फिरोज शेख, जावेद मास्टर, जीवन फाऊंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, फिरोज शेख आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनास इतिहास प्रेमी तसेच विद्यार्थ्यांनी कुतुहलाने प्रदर्शन पाहून संग्राहक सचिन डागा यांच्यावर या दुर्मिळ वस्तूंबद्दल प्रश्नांची बरसात केली. मोफत प्रदर्शन लावल्याबद्दल सचिन डागा यांचा सत्कार करण्यात आला. या प्रदर्शनात भारतीय संस्थानिक राजांचे स्टॅम्प पेपर, कोर्ट फी स्टॅम्प, स्वतंत्र भारतातील चलनी नाणी,स्मारके, शिक्के, ब्रिटीशकालीन शिके, मुगल राजांची नाणी, काश्मिरी राजांची नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांची नाणी, अहमदनगर शहराच्या राजांची नाणी, खोटी नाणी, तांत्रिक चुकीची नाणी, ब्रिटीशकालीन नोटा, संस्थानिक राजांच्या नोटा, पोर्तुगीत नोटा, हैद्राबाद निजामाच्या नोटा, खादी हंडी नोटस्, स्वतंत्र भारतातील जुन्या व नवीन चलनातील एक–ते दोन हजारपर्यंतच्या नोटा, बगीनर स्टॅम्प संग्रह, पोस्टल स्टॅम्प संग्रह, सिट लेटस्, मिनिएचर शिटस् आदी ठेवण्यात आली होती. सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. शफकत सय्यद यांनी आभार मानले.

# अहमदनगर शहराच्या स्थापना दिनानिमित्त

## अहमद निजामशाहा यांनी २८ मे १४९० रोजी स्थापना केली



पंधराव्या शतकाच्या अखेरीस, सन १४८६ मध्ये दक्षिण भारतातील बलाढ्य अशा बहामनी राजवटीची पाच शकले उडाली. स्वत:चे स्वतंत्र राज्य असावे या महत्वकांक्षेने फुटून निघालेल्या मलिक अहमद बहिरी याने प्रारंभी जुन्नर हे आपले मुख्यालय बनवले. अहमदला नेस्तानाभूत करण्यासाठी बिदरचा सेनापती जहांगीरखान प्रचंड सैन्यानिशी चालून आला. भिंगारजवळ तुंबळ लढाई झाली. अतिशय कमी सैन्य असतानाही मलिक अहमदने बलाढ्य जहांगीरला पराभूत केले. विजय मिळालेली जागा आपल्यासाठी शुभ आहे, असे मानून त्याने इथेच राजधानी वसवण्याचा निर्णय घेतला. तो दिवस होता. २८ मे १४९०! पुढे अवघ्या चार वर्षात म्हणजे १४९४ मध्ये निजामशाहीची राजधानी असलेले अहमदनगर शहर वसले. उत्तम नगररचना, समृद्ध बाजारपेठ, देखणी उद्याने, कारंजी खापरी नळाद्वारे पाणीपुरवठा, हातमाग व्यवसाय, टांकसाळ यामुळे नगर शहराचा नावलौकिक सर्वदूर पसरला. जगातील तेंव्हाची सुंदर शहरे असलेल्या कैरो व बगदादशी अहमदनगरची तुलना केली जात असे.

निजामशाही इ.स. १६३६ पर्यंत टिकली. या काळात या शहराने अहमदशाह, बुऱ्हाणशहा, सुल्ताना चाँदबिबी यांच्यासरख्या शूरवीरांची कारकीर्द पाहिली; तसेच गुजरातचया बहादूरशहा आणि अकबरपुत्र मुराद, दानियलच्या आक्रमणांचा चटकाही भोगला. मुकमिलखान दख्खनी, सलाबातखान, चंगेझखान, मलिकंबर यांच्यासारखे मुत्सद्दी; शहा ताहिरसारखे विद्वान; राजे शहाजी भोसले, कुंवरसेन, गोपाळराव, संभाजी चिटणवीस यांच्यासारखे कर्तबगार हिंदू प्रधान आणि शाहशरीफ, मिरावलीसारखे साधूपुरुष निजामशाहीच्या काळात होऊन गेले. जगप्रसिद्ध 'मुलाख मैदान' तोफ निजामशाहीच्या काळातच तयार झाली. निजामशाहीच्या पडत्या काळात शहाजीराजांनी मुर्तुझा निजामशहाला मांडीवर बसवून राज्यकारभार हाती घेतला आणि परकीय आक्रमणांपासून हे राज्य वाचविण्याचा प्रयत्न केला. मराठेशाहीची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने तेंव्हाच रोवली गेली. शहाजहान बादशहाने निजामशाहीचा समूळ नाश करुन अहमदनगर मोगलांच्या ताब्यात घेतले. पुढे दक्षिणेतील सुभेदार निजाम–उल–मुलूक दिल्ली दरबाराचा संबंध तोडून स्वतंत्र झाला. अहमदनगर त्याच्या ताब्यात आले. इ.स.१७५९ मध्ये अहमदनगर पेशव्यांकडे आले.

– **आबीद दुलेखान**, ९८६०४७७८६९

# निमगाव वाघा येथे 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या आनंद अनुभूती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

## ६ दिवस युवक–युवतींसह ग्रामस्थांना दिले जाणार तणावमुक्त जीवनाचे धडे



नगर – तणावमुक्त व आनंदी जीवन जगण्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे द आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने तर स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्याने आनंद अनुभूती या सहा दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा प्रारंभ २९ मे रोजी होणार असून, यामध्ये पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सहभागी होण्याचे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे व विशाल गावडे यांनी केले आहे.

गुरुवार पासून गावातील नवनाथ मंदिराच्या सभा मंडपात संध्याकाळी ५:३० ते ८:३० वाजे पर्यंत हे शिबीर होणार आहे. यामध्ये योग, प्राणायाम, सुदर्शन क्रीया व ध्यानबाबत प्रशिक्षण देऊन आयुष्यातील ताण, तणाव मुक्तीसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. तर मानसिक व अध्यात्मसंदर्भात तज्ञ मंडळी यांचे व्याख्यान होणार आहेत. वय वर्षे १८ पुढील युवक–युवतींसह सर्व ग्रामस्थांना या प्रशिक्षण शिबीरात सहभागी होता येणार असून, याचा सम ारोप ३ जून रोजी होणार आहे. शिबीरात सहभागी होण्यासाठी रामचंद्र लोखंडे ९१३०१३९६००, पै.नाना डोंगरे ९२२६७३५३४६, विशाल गावडे ९४०३३१८७०५ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# शिक्षिका संजना चेमटे यांनी राबविलेल्या वाचन प्रेरणा उपक्रमाचे यश

नगर – नगर तालुक्यातील यशवंतनगर येथील शिक्षिका संजना चेमटे या कोरोनाकाळापासून वाचन प्रेरणा उपक्रमात निरंतर वाचन उपक्रम यशस्वीपणे राबवित आहेत. या उपक्रमात ग्रंथालयाचा ध्यास धरी वाचन संस्कृती विकसित करी हा नवोपक्रम कायमस्वरूपी राबवितात.



शिक्षिका संजना चेमटे यांनी राबविलेल्या वाचन प्रेरणा उपक्रम राबविल्याबद्दल संगमनेरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांनी शासनाच्या वतीने विशेष प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला.

या उपक्रमात त्यांनी शाळा चालू असताना शाळेत आठवड्यातून एकदा विविध अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांनी आनंदाने ही पुस्तके वाचली. त्यानंतर उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्यावर ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या दारी या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या घरी विद्यार्थ्यांचे गट करून ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या दारी हा वाचन प्रेरणा उपक्रम राबविला. या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या घरी विविध अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवून त्यांना वाचण्यासाठी विविध पुस्तके उपलब्ध करून दिली. तसेच त्यांना घरी वाचण्यासाठी अनेक पुस्तके दिली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आनंदाने विविध पुस्तकांचे वाचन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजली. विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे बहीण, भाऊ, आई, वडील इतर विद्यार्थी यांनाही या वाचन उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. त्यांनीही विविध पुस्तकांचे वाचन केले. त्यामुळे घराघरात वाचन संस्कृती रुजली. वाचनाचे महत्त्व पालकांना, ग्रामस्थांना व इतरांना समजल्यामुळे त्यांनी लोकसहभागातून विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची अनेक पुस्तके दिली. तसेच शिक्षिका संजना चेमटे यांनी आपल्या मुलीच्या विवाहात दहा शाळेच्या ग्रंथालयास विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी एक हजार पुस्तकांचे वाटप केले. त्यामुळे वाचन प्रेरणा उपक्रमाची सामाजिक जनजागृती झाली. या वाचनप्रेरणा उपक्रमाचे सर्वांनी अभिनंदन केले. हा वाचन उपक्रम उपक्रमशील शिक्षिका संजना भगवंत चेमटे यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचेकडे सादर केला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांनी या नवोपक्रमाची तपासणी केली. हा नवोपक्रम जिल्ह्यात चौथ्या क्रमांकाने आला. तसेच हा नवोपक्रम राज्यस्तरासाठी पात्र ठरला. त्यामुळे तो राज्यस्तरावर पाठविण्यात आला. हा वाचन प्रेरणा उपक्रम पुरस्कारासाठी पात्र ठरला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांनी या उपक्रमाबद्दल शासनाच्या वतीने विशेष प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन उपक्रमशील शिक्षिका संजना चेमटे यांचा गौरव केला.

# २५ वर्षांनंतर शाळा पुन्हा एकदा भरली...

## शिशू संगोपन प्रा. शाळा व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलचा रौप्यमहोत्सवी स्नेहमेळावा धम्माल आणि जल्लोषात पार

नगर – ''गुरु माझं गणगोत गुरु हिच माऊली गुरु स्पर्श दूर करी दुःखाची सावली गुरुभेटी साठी जीवाची काहीली शिष्य तुमचा गुरु देवा पुरता अटल भेटले विठ्ठल आम्हा भेटले विठ्ठल...'' या ओळीप्रमाणे तब्बल २५ वर्षांनी माजी विद्यार्थ्यांनी लाडक्या शिक्षकांची भेट घेतली आणि एक अनमोल आठवण साजरी केली. शिशू संगोपन प्राथमिक शाळा व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल, अहिल्यानगर येथील सन १९९१ ते २००१ बॅचचे विद्यार्थी २५ मे रोजी तब्बल २५ वर्षांनी पुन्हा एकत्र आले आणि रौप्यमहोत्सवी शिक्षक–विद्यार्थी स्नेहमेळावा एक अपूर्व, अविस्मरणीय आणि अभूतपूर्व आनंदाचा क्षण बनून राहिला. या सोहळ्याचे आयोजन हॉटेल संजोगच्या हॉलमध्ये करण्यात आले होते. ढोल–ताशांच्या गजरात उपस्थित शिक्षकवृंद – आव्हाड सर, जाधव सर, सपाटे सर, वायसे मॅडम, नन्नवरे मॅडम, कोल्पेक मॅडम, पगारिया मॅडम, पालवे मॅडम, उंडे मॅडम, डोंगरे मॅडम, सांगळे मॅडम आणि शिक्षकेतर कर्मचारी दीपक धुमाळ काका यांचे स्वागत करण्यात आले.




शिशू संगोपन प्रा. शाळा व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलचा रौप्यमहोत्सवी स्नेहमेळावा धम्माल आणि जल्लोषात पार पडला.

महाराष्ट्रात कदाचित पहिली वेळ असेल जिथे कार्यक्रमाची सुरुवात विद्येच्या देवतेची म्हणजेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर सर्व शिक्षकांचा औपचारिक गुरुपूजन सोहळा थाटात आणि धूमधडाक्यात पार पडला. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या आठवणींना उजाळा देताना भावनिक आणि आनंदी क्षण शेअर केले. आणि हो मधली सुट्टी पण झाली आणि डबेही खाल्ले त्यानंतर गुरुवर्यांनी आपल्या प्रेरणादायी मनोगतातून विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

कार्यक्रमात दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना दोन मिनिटांचे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर सर्व शिक्षकांना स्मरण भेट देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप केक कापण्याने आणि मनसोक्त नृत्याने झाला. जुन्या मित्रांच्या भेटी, आठवणींच्या गप्पा आणि हास्यविनोदांनी सारा हॉल रंगून गेला.

अजय राठी यांनी सांगितले की कार्यक्रमाच्या यशामागे सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम होते. विशेषतः रोहन जगताप, मोरेश्वर आव्हाड, सरिता उजागरे आणि त्याला लाभलेली गोड सूत्रसंचालनाची साथ जी जयश्री गाढवे, रंजना अकूल, पूनम पित्रोडा यांनी अत्यंत सुरेखरित्या सांभाळली आणि लाभलेल्या आमच्या लाडक्या शिक्षकांची सोबत यामुळे कार्यक्रम अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडणारा झाला.

शाळा संपते, शिक्षणही पूर्ण होते पण शिक्षक आणि वर्गमित्रांचे नाते हे आयुष्यभर साथ देणारे असते! या भावनिक ओळीनं संपूर्ण कार्यक्रमाचा गाभा स्पष्ट झाला. या रौप्यमहोत्सवी स्नेहमेळाव्याने सर्वांच्या मनात एक नवीन ऊर्जेचा संचार केला आणि एक अविस्मरणीय आठवण म्हणून तो कायमचा कोरला गेला.



सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश मिळविले.

# कुटुंबाची जबाबदारी सांभाळत विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश प्रेरणादायी : पांडुरंग गवळी

## सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश

नगर – कुटुंबाची जबाबदारी सांभाळत शिक्षण घेणे हे फारच कठीण काम असते. मात्र या विद्यार्थ्यांनी दुहेरी कर्तव्य पार पाडत आपल्या मेहनतीचे फळ मिळवले आहे. हे यश इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. दहावी ही आयुष्यातील महत्वाची पायरी असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हे विद्यार्थी सज्ज झाले असून, त्यांनी भविष्यातील योग्य दिशा ठरवून वाटचाल करण्याचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना आवाहन केले.

नव विद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी (एस.एस.सी.) बोर्डाच्या परीक्षेत उत्तम कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. दिवसा पूर्ण वेळ काम करून, रात्री शाळेत येऊन अपूर्ण शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या आयुष्यातील या महत्त्वाच्या टप्प्यावर यश मिळवले आहे.

या यशानंतर शाळेच्या वतीने दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी, वर्गशिक्षिका देवका लबडे, शिक्षक विलास शिंदे, विणा कुऱ्हाडे, महेंद्र म्हसे तसेच शिक्षकेतर कर्मचारी राजू भुजबळ आदी उपस्थित होते.

स्कूलचा यंदाचा दहावीचा निकाल ६६.६६ टक्के लागला आहे. या निकालामध्ये ज्योती मनोहर टिपरे हिने ६१.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या पाठोपाठ ललिता दगडू कांबळे हिने ५९.२०% गुण मिळवून द्वितीय स्थान मिळवले तर मनीषा सूर्यभान कांबळे हिने ५७% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

पदाधिकारी डॉ. रवींद्र साताळकर, डॉ. निलेश वैकर, डॉ. अनिरुद्ध गीते, मंगेश धर्माधिकारी आदी विश्वस्तांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# चास येथील आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरू

नगर – आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता मान्यता मिळालेली आहे. यंदाच्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे पासून ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे, याची माहिती संस्थेचे संस्थापक प्रा. अनिरुद्ध आडसूळ यांनी दिली. विद्यार्थ्यांनी २० मे ते १६ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. तसेच कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी असे आवाहन प्राचार्य आर. एस. गडाख यांनी केले आहे. सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतनमधील अद्ययावत संगणकीय साधन सामाग्री, इंटरनेट सुविधा, प्रशिक्षित व योग्य सुसंवाद साधणारा प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांची सुसज्ज बैठक व्यवस्था या सर्व सुविधा लक्षात घेऊन तंत्रशिक्षण विभागाने हे सुविधा केंद्र सुरू करण्यास परवानगी दिली आहे. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या अंतर्गत गुण मूल्यमापनाचा आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्याने ऑनलाईन पद्धतीने १६ जूनपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य असेल. पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कुठल्याही प्रकारची सी.ई.टी. परीक्षा नसेल इच्छुकांनी सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतन चास अहमदनगर येथे संपर्क साधावा. प्रवेशाकरिता सुविधा केंद्रामार्फत आवश्यक असणारे कागदपत्रे व इतर माहितीसाठीचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईल.

आडसूळ पॉलिटेक्निक विद्यालयामध्ये यंत्र अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इत्यादी शाखा २०१० पासून उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ९८५०२३५५५३ वर संपर्क साधावा.

# दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील महत्वाचा वळणबिंदू

## सहसचिव रामकिसन देशमुख यांचे प्रतिपादन

नगर – दहावीच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर काही विद्यार्थ्यांना आनंद झाला तर काहींच्या पदरी निराशा प्राप्त झाली. अशी परिस्थिती असली तरी विद्यार्थ्यांच्या स्वप्नाला आभाळ ठेंगणे वाटते, तर अपयशाच्या सीमेवर पुन्हा पुरवणी परीक्षा देऊन स्वतःच्या जीवनाचा मार्ग नव्याने शोधण्याच्या तयारीत विद्यार्थी असतात. दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा वळणबिंदू असतो, असे प्रतिपादन सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव रामकिसन देशमुख यांनी केले.



डॉ.पाऊलबुधे विद्यालयातील १० वी, १२ वी परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. (छाया– विजय मते)

वसंत टेकडी येथील डॉ.ना.ज.पाऊलबुधे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १०वी, १२ वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार प्रा.दादासाहेब भोईटे, संकुल प्रमुख प्राचार्या डॉ.रेखाराणी खुराणा, प्राचार्या विजया नवले, सुनिता त्रिंबके, वैशाली शिर्के, माजी शिक्षक राजेंद्र मोरे, प्रा.रंगनाथ वाघ, प्रा. रोहिदास चौरे, लक्ष्मण बेळगे अंबादास शिंदे, विनायक सापा, घनश्याम सानप आदी उपस्थित होते.

### डॉ.पाऊलबुधे विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

श्री.देशमुख म्हणाले अकरावी प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. या टप्प्यावरच विद्यार्थ्यांचे पुढचे शिक्षण, करियर आणि व्यावसायिक आयुष्याची दिशा ठरते. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या कला, गुणा चे आवडीनुसार पुढील शिक्षणाची निवड करताना चा निर्णय विचारपूर्वक घ्यावा. असे आवाहन केले.

प्रा.दादासाहेब भोईटे म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे निरीक्षण करावे, त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधावा, त्यांची आवड निवड लक्षात घेऊनच उज्वल भविष्याची दिशा ठरवावी, मुलांच्या बुद्धिमत्तेचा विचार त्यांच्या कलाचा आदर करावा. त्यांना केवळ जीवघेण्या स्पर्धेत न ढकलता आनंदाने शिकण्याचा, शिकता शिकता, जगण्याचा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न पालकांनी करावा.

प्राचार्य विजया नवले यांनी प्रास्ताविकात सेवा शिक्षण मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचा सातत्याने प्रयत्न असतो. शिक्षकांचे अथक परिश्रमाला विद्यार्थ्यांच्या कष्टाची जोड मिळाल्याने या विद्यालयाचा निकाल १००टक्के लागलेला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयाचा नावलौकिक वाढत आहे बारावीच्या विज्ञान शाखेतील ओम सानप विद्यार्थ्यांने परीक्षेत यश तर मिळविले शिवाय मल्लखांब स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन दिपक परदेशी यांनी केले. विष्णु मगर यांनी आभार मानले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या चौंडी येथील स्मृतीस्थळ विकास आराखड्यासाठी ६८१ कोटींच्या खर्चास प्रशासकीय मान्यता

मुंबई – पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मगाव असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील मौजे चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाचे जतन व संवर्धन विकासासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने ६८१ कोटी ३२ लाख रुपयांच्या विकास आराखड्यात प्रशासकीय मान्यता दिली आहे, त्यासंदर्भातील शासननिर्णय नियोजन विभागाने २८ मे रोजी जारी केला आहे. सदर आराखड्याच्या संनियंत्रण आणि अंमलबजावणीची जबाबदारी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सातत्याने संबंधीतांच्या बैठका घेऊन पाठपुरावा केल्यामुळे सदर शासन निर्णय निश्चित वेळेत जारी होऊ शकला. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जन्मगावी चौंडी येथील त्यांच्या स्मृतीस्थळाचा विकास व्हावा, यासाठी ना. अजित पवार प्रयत्नशील होते. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेली आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाची महत्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरुप लक्षात घेऊन संबंधीत आराखडे नियोजन विभागामार्फत राबविण्यात येतात. स्थानिक पातळीवरील संबंधित आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन चौंडी स्मृतीस्थळ जतन व विकास व त्यास लागणाऱ्या निधीचा आराखडा अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. त्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून ६ मे रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाने ६८१ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मंजूरीचा शासननिर्णय आज जारी केला.

या शासननिर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना त्यांचे ऐतिहासिक महत्व, वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती, संस्थांकडूनंच ही कामे करु घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. जी कामे केंद्र शासनाच्या PRSD योजना, स्वदेश दर्शन योजना किंवा अन्य योजनांमधून शक्य आहेत. ती त्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहेत. विकास आराखड्यातील सर्व कामे पुढील तीन वर्षात ३१ मे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही शासन निर्णयात दिले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात मंत्रालयात सातत्याने बैठका घेऊन सदर विकास आराखड्यास प्रशासकीय मंजूरीची कार्यवाही पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आहे.

# अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवांतर्गत २९ मे रोजी शोभायात्रेचे आयोजन

नगर – विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीजन्मशताब्दीनिमित्त अहिल्यानगर गौरव दिन व 'पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन २९ ते ३१ मे दरम्यान करण्यात आले आहे. या अंतर्गत २९ मे रोजी अहिल्यानगर शहरात आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता दिल्लीगेट येथून यात्रेस प्रारंभ होणार असून बालिकाश्रम रोड मार्गे प्रेमदान चौक, प्रोफेसर कॉलनी चौकात रात्री ९ वाजेपर्यंत येईल व तेथेच समारोप होईल. यावेळी डॉ.सुजय विखे, जिल्ह्य पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी प्रमुख पाहुणे उपस्थित रहाणार आहेत, अशी माहिती शोभायात्रेचे संयोजक उदय भणगे यांनी दिली.

महोत्सवाचे कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे यांनी सांगितले, अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेत ढोलपथक, ध्वजपथक, पारंपारिक गजनृत्य आदींचा समावेश असणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा व परंपराचे प्रदर्शन करणारे एकूण २० प्रकारच्या आकर्षक रथांचा समावेश या यात्रेत असणार आहे. यात्रेच्या अग्रभागी ग्रामदैवत श्री विशाल गणपतीचा रथ असणार असून त्यामागे प्रभू श्रीराम, अहिल्यादेवी होळकर, आनंदऋषीजी महाराज, शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, संत निळोबाराय, संत ज्ञानेश्वर, सद्गुरु गोदड महाराज, शेख मोहम्मद बाबा, संत भगवान बाबा, साईबाबा. अगस्ती ऋषी, राघोजी भांगरे, जनजाती कल्याण आश्रम, वीर जवान, हिंदुजागृती व अखंड भारत भारत भारती आदी आकर्षक व रथांचा समावेश असणार आहे. तसेच कर्जतचे सद्गुरु श्री गोदड महाराजांच्या यात्रेतील रथाच्या प्रतिकृतीचा समावेश यात असणार आहे. नागरिकांनी या यात्रेत सहभागी होऊन अहिल्यानगरचा गैरव व अभिमान वाढवावा असे आवाहन विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या करण्यात आले आहे.



स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त चौपाटी कारंजा येथे शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मध्यमंडल अध्यक्ष मयूर बोचुघोळ, उपाध्यक्ष धनंजय जाधव, सरचिटणीस प्रशांत मुथा, महेश नामदे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रियाताई जानवे, सावेडी मंडलाध्यक्ष सीए राजेंद्र काळे, केडगाव मंडळ अध्यक्ष भरत ठुबे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, सचिव गोपाल वर्मा, कालिंदी केसकर, सोनाली पाठक, बाळासाहेब गायकवाड, तुषार पोटे, बाळासाहेब खताडे, अनिल निकम, रोहित पठारे, सचिन पळशीकर, सुजित खरमाळे, प्रज्योत लुणिया, हर्षल बोरा, महेश गुगळे, राजू एकाडे, गणेश मारवाडे, विलास नंदी, अजिंक्य गुरावे, सोमनाथ मुळे, राहुल जामगांवकर, साहेबराव काते, सुरेश लोळगे, प्रकाश जोशी, विश्व हिंदू परिषदेचे गजेंद्र सोनवणे, कैलास गर्जे, करण कराळे, डॉ.दर्शन करमाळकर, प्रवीण ढोणे, चंद्रकांत मानकर, ज्ञानेश्वर धिरडे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# शहरात २९ मे रोजी पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन

## अहिल्यानगर गौरव दिन व 'पालकमंत्री' सांस्कृतिक महोत्सवांतर्गत आयोजन

नगर – अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त २९ मे रोजी काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेनिमित्त पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी कोणतीही नावनोंदणी किंवा प्रवेश फी नसून स्पर्धेत सहभागी होऊन इच्छिणाऱ्यांनी पौराणिक काळातील देवी देवता, ऋषीमुनी, ऐतिहासिक काळातील संत महंत, राजे महाराजे, स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी यांच्यावर आधारित वेशभूषा करून सायंकाळी ६ वाजता निघणाऱ्या शोभायात्रेत सहभागी होणे आवश्यक आहे. पारंपरिक वेशभूषा स्पर्धा वयोगट ५ ते १८ वयोगटातील मुले मुली व वय १८ वर्षांवरील पुरुष व महिला अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. दोन्ही वयोगटातील तीन उत्कृष्ट वेशभूषा धारकांना आकर्षक पारितोषिक देण्यात येणार आहेत, अशी माहिती स्पर्धेचे संयोजक निखील वारे यांनी दिली. या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहिल्याबाई होळकर या देशाचे भूषण

## भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांचे प्रतिपादन; त्रिशताब्दी दिनानिमित्त भाजप युवा मोर्चाच्यावतीने युवा प्रेरणा संवाद कार्यक्रम



अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त भाजप युवा मोर्चाच्यावतीने युवा प्रेरणा संवाद कार्यक्रम उत्साहात पार पडला. (छाया – लहू दळवी)

नगर – भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जात असून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे गरजेचे आहे. त्यांच्या माध्यमातून २१ व्या शतकात भारत देश हा महासत्ता बनेल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे भारत देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या स्थानावर आली आहे. आपल्या राज्याला संत, महंत व महापुरुषांच्या विचाराची मोठी परंपरा लाभली आहे. आजच्या युवकांनी त्यांचे विचार व प्रेरणा अंगीकारून आपली वाटचाल करावी. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थळ आपल्या जिल्ह्यात असून त्यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त समाजातील गुणवंतांचा सन्मान सोहळा झाला आहे. अहिल्याबाई होळकर हे आपल्या जिल्ह्याचे नव्हे तर देशाचे भूषण आहे त्यांनी ३०० वर्षांपूर्वी केलेल्या कार्याची आठवण आपण सर्वजण आजही काढत आहोत, असे प्रतिपादन भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त भाजप युवा मोर्चाच्या वतीने युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात गुणवंतांचा सत्कार सोहळा झाला. यावेळी अक्षय कर्डिले, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ, संचालक हरिभाऊ कर्डिले, युवा मोर्चाचे सचिव निरंजन डहाळे, यूपीएससी उत्तीर्ण ओंकार खुंटाळे, विलास शिंदे, अण्णासाहेब बाचकर, दादाभाऊ चितळकर, बाळासाहेब महाडिक, राहुल शिंदे, बाबासाहेब खर्से, संतोष म्हस्के, रेवणनाथ चोभे, सचिन कुसळकर आदीसह युवक उपस्थित होते.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श आजच्या युवकांनी अंगीकारून कुशल प्रशासक बनण्याचा प्रयत्न करावा, संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करीत समाजामध्ये चांगले काम उभे करावे. आजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये ध्येय निश्चित करून यशाच्या शिखराकडे वाटचाल करावी, यासाठी स्वतःवर विश्वास ठेवून काम करावे, आपण कर्म चांगले केले असेल तर फळ नक्कीच मिळत असते असे मत यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थी ओंकार खुंटाळे यांनी व्यक्त केले.

तर युवा मोर्चाच्या माध्यमातून राज्यभर राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून नगर जिल्हा युवा मोर्चाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार सोहळा राजमाता अहिल्याबाई होळकर यांची वेशभूषा तसेच दानपट्टा सांस्कृतिक कार्यक्रमाचे व राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनपटावरील प्रदर्शनाचे आयोजन केले होते. पारंपरिक रॅलीने नागरिकांची मने जिंकली असल्याचे मत युवा मोर्चाचे सचिव निरंजन डहाळे यांनी व्यक्त केले.

आजचा युवक महापुरुषांच्या विचारांपासून लांब चालला असून त्यांच्यापर्यंत विचार पोहोचविण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी समाजामध्ये राबविले आहे. आपली संस्कृती महान असून तिचे जतन करण्यासाठी युवकांनी पुढे येणे गरजेचे आहे. महापुरुषांच्या विचारांच्या माध्यमातून चांगली पिढी निर्माण होईल असे मत शिवभक्त आरती कडूस यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक दिलीप भालसिंग यांनी तर सूत्रसंचालन बाबासाहेब खर्से यांनी केले. रभाजी सुळ यांनी आभार मानले.

# मतदारसंघात मल्टीमोडल लॉजिस्टिक हब हवा

## खासदार नीलेश लंके यांची मागणी; मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची घेतली भेट, नगर-श्रीगोंदे-कर्जत तालुक्यांची शिफारस

नगर – नगर-श्रीगोंदे-कर्जत परिसरात मल्टीमोडल लॉजिस्टक हब स्थापन करून पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला नवे बळ देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी केंद्रीय नौवहन, बंदर व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडे केली. खा. लंके यांनी मंत्री सोनोवाल यांना या मागणीचे निवेदनही सादर केले.

खा. लंके यांनी यासंदर्भात मंत्री सोनोवाल यांची भेट घेत शेती, उद्योग आणि रोजगाराला गती मिळेल याकडे लक्ष वेधत लॉजिस्टिक हबमुळे स्थानिक शेतकऱ्यांना थेट बंदर संपर्क, प्रक्रिया उद्योग, कोल्ड स्टोअरेज, लघुउद्योगांना चालना मिळून रोजगार निर्मितीस मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले. स्थानिक बाजारपेठेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होणार असून युवकांसाठीही रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या होतील असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला



नगर-श्रीगोंदे-कर्जत परिसरात मल्टीमोडल लॉजिस्टक हब स्थापन करून पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला नवे बळ देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडे केली.

**शेतकऱ्यांना फायदा, रोजगार निर्मिती...** खासदार नीलेश लंके यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार लॉजिस्टिक हबमुळे स्थानिक शेतकऱ्यांना थेट बंदर संपर्क, प्रक्रिया उद्योग, कोल्ड स्टोअरेज, लघुउद्योग यांना चालना मिळून रोजगार निर्मितीस मोठा फायदा होणार आहे. स्थानिक बाजारपेठेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होणार असून युवकांसाठी रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या होतील.

**आवश्यक जमीन व स्थानिकांचा पाठींबा...** या हबसाठी या परिसरात आवश्यक जमीन उपलब्ध असून स्थानिकांचा सक्रीय पाठींबा या प्रस्तावास लाभला असल्याचे खा. लंके यांनी मंत्री सोनोवाल यांच्या निदर्शनास आणून दिले. सागरमाला योजनेचा उद्देश म्हणजे बंदरांना राज्याच्या आतील भागांशी जोडणे हा आहे त्यामुळे हे क्षेत्र त्यासाठी अत्यंत योग्य असल्याचा दावा त्यांनी केला. केंद्र सरकारने या मागणीची दखल घेऊन नगर-श्रीगोंदे-कर्जत हबला सागरमाला प्रकल्पात समाविष्ट करावे अशी मागणी करतानाच हा प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रासाठी प्रगतीची नवी दिशा देणारा ठरेल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला.

**निर्यातक्षम शेतीचे उत्तम केंद्र...** नगर, श्रीगोंदे व कर्जत तालुके हे जेएनपीटी बंदरांशी रेल्वेने थेट जोडलेले असून एम.एच.१६० महामार्ग शिर्डी, पुणे विमानतळ आदी दळणवळणाच्या उत्तम सुविधा उपलब्ध आहेत. या भागात द्राक्षे, डाळिंब, कांदा, उस, गहू, जैविक उत्पादने मोठया प्रमाणात उत्पादीत होत असून निर्यातक्षम शेतीचे उत्तम केंद्र म्हणून या भागाकडे पाहिले जात असल्याचे खा. लंके यांनी मंत्री सोनोवाल यांच्या निदर्शनास आणून दिले.

# वाहतूक कोंडीत अडकलेल्या बसच्या वाहकास मारहाण

नगर – बस वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे उशीर होत असल्याचा राग अनावर झाल्याने दोघांनी बसवाहकास शिवीगाळ करुन धमकी देऊन अनोळखी इसमाच्या मदतीने धक्काबुक्की करत मारहाण केल्याची घटना नगर-पुणे रोडवरील केडगाव बायपास येथे २७ मे रोजी दुपारी घडली.

याबाबत एसटी बस वाहक शिवाजी भागवत सोनाळकर (वय ४०, रा. लाखनवाळा, ता. खामगाव, जिल्हा बुलढाणा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे बसचालक विशाल पाटील यांच्यासह मुंबई कुर्ला येथून एसटी बस (क्र. एम एच ०९ एफ एल १०३४ ) ने प्रवासी घेऊन नगरमार्गे जाफराबाद येथे जात होते. चास येथून नगरकडे एसटी बस येत असताना वाटेत जोराचा पाऊस असल्याने रस्त्यावर वाहतूक खूप असल्याने एसटी बस सावकाश चालत होती. त्यामुळे बसमधील सोहम करपे यास त्याच्या निश्चित स्थळी पोचण्यास उशीर होत असल्याने त्याने फिर्यादी यांना मला उशीर होत आहे मला केडगाव बायपास येथे सोडा, असे म्हटले. त्यावर फिर्यादी यांनी हो सोडतो असे म्हणाले. परंतु वाहतूक कोंडीमुळे उशीर होत असल्याने करपेचा राग अनावर होऊन त्याने फिर्यादीस तुम्हाला डोक्याचा भाग आहे का, तुम्ही झोपा घेता का, काय काम करता, असे म्हणून शिवीगाळ केली. तेव्हा फिर्यादी यांनी शिवीगाळ का करता असे म्हटले असता करपे याने फोन करुन कोणालातरी केडगाव बायपास येथे बोलावून घेतले.

दरम्यान एसटी बस केडगाव बायपास येथे आली असता सोहम करपे यांनी फोन केलेल्या अनोळखी इसमाने हॉटेल नील येथे येऊन त्याने एसटी बस थांबवून बाजूला घेण्यास सांगितले. आणि फिर्यादीस तुम्ही का झोपा घेता, शिस्तीत रहा असे म्हणून गचांडी पकडून धक्काबुक्की केली. हाताच्या चापटीने तोंडावर मारहाण केली त्यावेळी गाडीतून सोहम करपे व श्याम कलान हे दोघे प्रवासी खाली उतरुन त्यांनी शिवीगाळ करुन तू नोकरी कशी करतो तेच पाहतो, अशी धमकी दिली व मारहाण केली.

याप्रकरणी बसवाहक शिवाजी सोनाळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी दोघांच्या विरुध्द मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.



भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना जागा देऊन घरकुलाचा लाभ द्यावा, अशा आशयाचे निवेदन एकलव्य संघटनेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

# भूमिहीन समाजाच्या कुटुंबीयांना जागा देऊन घरकुलाचा लाभ द्यावा

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व कोरेगाव व वाकोडी या गावात बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्व्हे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड, नाशिक सभापती शिवाजी ढवळे व संपर्कप्रमुख एकनाथ बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना बंडू बर्डे, शांतीलाल राऊत, विजया गायकवाड, संजय गायकवाड, छाया बर्डे, आशा माळी, विलास बर्डे, सुनिता गायकवाड, नवनाथ गायकवाड, विजय गांगुर्डे आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

आदिवासी भिल्ल समाजाचे कोरेगाव व वाकोडी येथे अनेक कुटुंबीय असून त्यांच्या नावे कोणत्याही गावांमध्ये शेतजमीन अथवा घर बांधण्यासाठी जागा नावावर नाही तसेच त्यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने जागा विकत घेता येत नाही व उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्याने अनेक वेळा उपाशी राहावे लागते त्यामुळे इकडे तिकडे भटकंती करावी लागत असून दिवसातून एक वेळा जेवले की दुसरी वेळ उपाशी राहावे लागते त्यामुळे या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभ भेटत नाही. त्यामुळे जागा नावावर करून देण्यासाठी जीआर काढण्यात यावा व देशाचा आदिवासी देशाचा मालक असून त्यांना जागा राहण्यापूर्ती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांचे सर्वे करून जागा अथवा गावातील महाराष्ट्र शासनाची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# हॉटेल चालकावर खुनी हल्ला करणारे २ आरोपी जेरबंद

## गेल्या ८ महिन्यांपासून होते फरार, घरी येताच पोलिसांनी पकडले

नगर – नगर दौंड रोड वरील बाबुर्डी बेंद येथील हॉटेल राजवीर चे मालक मनोज उर्फ दत्तात्रेय बाजीराव चोभे याच्यावर कोयता, तलवार, लोखंडी रॉडने खुनी हल्ला करून पसार झालेले २ आरोपी नगर तालुका पोलिसांच्या पथकाने ८ महिन्यानंतर पकडले आहेत. प्रवीण उर्फ दिगंबर बाबासाहेब कांबळे व किरण संजय कांबळे (दोघे रा. अरणगाव, ता.नगर) अशी या आरोपींची नावे आहेत.

हा हल्ला १९ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी रात्री झाला होता.मनोज चोभे हे हॉटेल राजवीर येथे असतांना अचानक यातील आरोपींनी त्यांच्या इतर साथीदारांसह येवून तु लई माजलास का? तु हॉटेलवर मुल का लपवलेस, बाहेर काढ नाहीतर तुला जिवे ठार मारुन टाकु असे म्हणून त्यांच्या हातातील कोयता, तलवार, लोखंडी रॉड याने फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हल्ला करून फिर्यादीचे डोक्यात तलवार मारली असता फिर्यादी यांनी हात मध्ये घातल्याने फिर्यादी यांचा अंगठा तुटून त्यांचे डोक्यास गंभीर इजा झाली होती. तसेच फिर्यादी यांच्यावर लोखंडी कत्तीने वार केल्याने फिर्यादी यांचे दोन्ही हातांचे अंगठे तुटून गंभीर इजा झाली होती. तसेच सर्व आरोपी फिर्यादी यांना मारत असतांना वरील सर्व जण याला जिवंत सोडू नका, म्हणून वरील सर्व त्यांच्या हातातील हत्याराने मारहाण करत होते. फिर्यादी खाली पडल्यावर वरील लोक पळून गेले. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडल्या पासून २ आरोपी फरार होते.



हॉटेल चालकावर खुनी हल्ला करून ८ महिन्यांपासून फरार असलेल्या दोघा आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत नगर तालुका पोलिसांचे पथक.

प्रवीण कांबळे व किरण कांबळे हे अरणगाव परिसरात येणार असल्याची माहिती स.पो. नि. प्रल्हाद गिते यांना २७ मे रोजी मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, पो. हे. कॉ. सुभाष थोरात, बाबा खेडकर, नितीन गांगुर्डे, संभाजी बोराडे, विक्रांत भालसिंग, राजू खेडकर यांच्या पथकाने अरणगाव परिसरात सापळा लावून या दोघांना शिताफीने पकडले आहे.

